गुरुचरित्रातील घटनांप्रमाणे आहेत. बाबांनी महान परिश्रम व कठोर तपश्चर्या करून अध्यात्मविद्या संपादन केली आहे. त्यांच्याकडे येणाऱ्या मंडळीत शेतकरी पाटलांपासून परदेशाहून आलेल्या लोकापर्यंतचे सर्व जातीतील, थरातील व धर्माचे लोक असतात. श्री. बाबांचा एक विशेष असा आहे की त्यांचे सदोदित आपले सद्गुरु श्रीमाळीबाबा यांचे फोटोपुढे बसून नामस्मरण चालू असते. बाबांना काही विचारावयाचे असल्यास अमुक वार अमुक वेळ असे काहीच नाही. केव्हाही प्रश्न न विचारताच उत्तर मिळू शकते. पण आपलाच योग असावा लागतो. कित्येकदा ते काही व्यक्तींना भेटत नाहीत. त्याची अनेक कारणे असतात, व ती त्यांनाच ठाऊक असतात. आपल्याकडे येणाऱ्या माणसाची त्यांना अगोदरच कल्पना आलेली असते. त्यामुळे कित्येकदा ते जनसंपर्क टाळतात. बाबांनी चिंतनाने व संशोधनाने 'महामृत्युंजय मार्कंडेय मंत्र' व 'लक्ष्मी गरुड मंत्र' तयार केलेले आहेत. त्यांनी आपले शिष्य मात्र तयार केलेले नाहीत.

श्री. बापूसाहेब उर्फ बाबांना दिव्यदृष्टी, दिव्यश्रुती व वाचासिद्धी या गोष्टी अवगत आहेत ही गोष्ट आता पंचखंडात व जगातील सर्व मोठ्या राष्ट्रात ज्ञात झालेली आहे. तसेच त्यांच्या भूत-भविष्य व वर्तमान यांच्या ज्ञानाचाही असंख्यांना चांगलाच पडताळा आलेला आहे. १९५४ चा जपानमधील भूकंप, १९५७ मध्ये झालेला लाओसच्या चीफ सेक्रेटरीचा खून, १९६४ त अमेरिकेने केलेला अणू स्फोट, १९६१ मधील पानशेत धरण फुटणे, १९६७ मधील कोयनेच्या परिसरातील प्रचंड भूकंप, गिरी राष्ट्रपती नक्कीच होणार इ. इ. त्यांनी प्रत्यक्ष घटना घडण्यापूर्वी सांगितलेल्या या सर्व घटना अगदी खऱ्याखुऱ्या झाल्या आहेत. बापूसाहेबांकडे दरवर्षी दत्तजयंती, गुरुपौर्णिमा, पिठोरी अमावस्या, श्रीमाळी बुवांचे गुरू श्री दत्त नागेबाबा यांची पुण्यतिथी व चैत्र शुद्ध सप्तमी ही श्रीमाळीबुवांची पुण्यतिथी हे उत्सव उत्साहाने साजरे केले जातात. श्रीबापूसाहेबांच्या दिव्यशक्तिचा जगात सर्वत्र उपयोग होवो, त्यांच्या सिद्धीने असंख्यांचे भले होवो आणि बापूसाहेबांची कीर्ती त्रिखंडात आणखीन वाढती राहो अशी शुभेच्छा प्रगट करतो.


## श्रीसाईलीला ऑगस्ट अंकात

ख्यातनाम दत्तभक्त श्री सिद्धराज माणिकप्रभु महाराज

माणिकनगर

गाठीभेटी या सदरात अवश्य वाचा

# सुख वसे तुझे पायी

[ काटोलचे महान साईभक्त संत श्री गुलाबबाबा यांच्या १ जुलैच्या वाढदिवसा निमित्य]

लेखक : श्री. दा. ना. देशमुख,
C/o रामजी पहेलवान यांचा वाडा
सक्करदरा रोड, नागपूर.

प्रत्येकजण प्रार्थना करीतो ते सुखासाठींच दुःखासाठी नव्हे. सुख प्राप्त व्हावे म्हणून आपण अहर्निशी धडपडत असतो. ज्यांना कधी ते स्वताःलाही मिळाले नाही अशांच्याही मागे आपण जातो. आणि मग मात्र आपली घोर निराशा होते, तर ह्या सुखाकरिता कोणाचे मागे आपण जावं. तुकारामाचे शिष्य निळोबा महाराज ग्वाही देऊन सांगतात :—



संत श्री गुलाब बाबा

" मार्ग दाखऊनि गेले आधी,
दयानिधि संत ते।
तेणेचि पंथे चालो जाता।
न पडे गुंता कोठे कांहीं ॥

ज्या संतांनी हा मार्ग दाखवून दिला अशांच्याच सन्मार्गाने जाता आपणास कोणतीच अडचण पडणार नाही. म्हणून ज्यांनी सुखाचा परमोच्च आनंद घेतला अशा संत तुकाराम महाराजासारख्या संताकडे आपणास जावयास पाहिजे, तुकाराम महाराज देवाला म्हणतात मी ह्या सुखासाठीं पुरापुरा विचार करून निर्णय घेतला की—

" सुख वसे तुझे पायीं। मज ठेवी तेचि ठायीं ॥

तुकाराम महाराज आपल्या अभंगातून सांगतात "पांडुरंगा मला तुझ्या पाया जवळच राहू दे कारण सुख हे तुझ्या पाया जवळच आहे.

पण आम्हीं संसारी अज्ञानी लोक सुख हे पैशामधे पाहतो व ते लक्ष्मीच्याच कृपेने मिळते म्हणून " आम्हाला लक्ष्मीच्याच चरणी ठेवा अशी प्रार्थना देवाला करीतो.

संसारातील सुखाचा मार्ग म्हणजेच " लक्ष्मी " हीच्यासाठी तुकाराम महाराज आपल्या एका अभंगातून सांगतात "ज्या लक्ष्मीला परम सुखाच्या प्राप्तीसाठी भगवंताच्या श्री चरणांचा आश्रय घ्यावा लागला अशा लक्ष्मीच्या पायी मला ठेवू नकोस. (" पांडुरंगा मला तुझ्याच पायीं ठेव ").

हे करिताना मला माझं प्रारब्ध आपल्या पायाजवळ येण्यास रोखतं, व त्याच्याही निवारणार्थ उपाय त्यानी आपल्या खालील अभंगात सांगितला आहे :—

" नाम संकीर्तन साधन पै सोपे ।
जळती पापे जन्मांतरीचे ॥

अशा तऱ्हेने आपल्या प्रारब्धानुसार संचिताचा नाश करून भगवंताच्या परम सुखाचा आनंद घेऊ शकतो. हे तुकारामानी स्वतः अनुभवून जगाला सांगितले.

तुकारामाच्या काळापासून अनेक संतानी हाच सन्मार्ग अवलंबीला, व अगदी नजीकचे काळापर्यंत श्री संत डेबुजी उर्फ गाडगे महराजांनी "गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला" ऱ्या गजरातून साऱ्या देशातील दीन दुबळ्यांची सेवा केली. महाराष्ट्र तर त्याला विसरू शकत नाही आणि त्याच्याच कोंदणातील हा अष्ट पैलू हिरा **श्री संत गुलाब बाबा** त्यांच्याच पाऊलावर पाऊल ठेवून त्यांच्याच दैवी संपत्तीचा जणू काय वारसा घेऊन आजच्या ह्या विज्ञान युगाच्या सोसाट्याच्या वाऱ्यात वारकरी सांप्रदायाची पताका घेऊन रंजल्या गांजल्यांची सेवा करीत आहेत.

## संत हे सुखाच्या मार्गाचे दीप स्तंभ

जहाज चालविणाऱ्या नाविकांना योग्य मार्गदर्शन घडावे व अफाट समुद्रात चालणारे जहाज दुर्घटना ग्रस्त होऊ नये ह्याच उद्देशाने ठिकठिकाणी द्वीप स्तंभ उभारले जातात त्याच प्रमाणे संत देखील ह्या कलीयुगी जीवन जगणाऱ्या मानवाचे दिपस्तंभ स्वरूपच मार्गदर्शक असतात.

" ह्याच साठी संत पाय सेवावे ।
तरी तरावे तुका म्हणे ॥

वर वर्णिलेल्या सुखाकरिता आपल्याला संताचेच पाय धरावे लागतील. संत तेची देव असेही अनेकांनी म्हटले आहे. म्हणून श्री संत गुलाबबाबातील दैवत्वाविषयी आता लक्षावधी लोकांनी ग्वाही दिली आहे. श्री बाबा ज्ञान व शांतीची साक्षात प्रतिमा आहेत ते सदैव आत्मा स्वरूपातच निमग्न असतात. त्यांच्या वाणीत अमृताचा अंश आहे असे त्यांचे किर्तन ऐकणाऱ्यांना होतो. श्रीमंत व गरीब यांना ते सम दृष्टीनेच निहारतात. त्यांचे अंतस्करण प्रशांत महासागराप्रमाणे शांत आहे. त्यांच्या कार्य प्रणालीचे रहस्या बाबत अवगत होणेही मानवी शक्तीच्या आटोक्या बाहेरील गोष्ट आहे. स्वतः सिद्ध असून देखील अत्यंत विनम्र, दयाळू व निरअभिमानी ते आहेत. आज त्यांचा जन्म दिवसानिमित्त.

" मागणे तुज प्रति आहे "
देशील तरी पाहा हे " संत गुलाबा "
तर मागण हेच.
" सुख वसे तुझे पायीं । मज ठेवी तेंचि ठायी ॥

✲

# तुमचे श्रीसाईबाबांविषयी सामान्यज्ञान किती आहे ?

[पुढील पैकी सहा प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, आठ प्रश्नांची उत्तरे देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व देता आल्यास उत्कृष्ट समजावे.]

१) तुझा माझा बहात्तर पिढ्यांचा संबंध आहे असे साईबाबांनी......सांगितले.
   अ) चांदोरकरांना, ब) दिक्षितांना, क) शामास, ड) निमोणकरांना

२) मेघा......भक्त होता
   अ) गणपती, ब) साईबाबा, क) शंकर, ड) ज्योतिबा

३) "आरती साईबाबा, सौख्य दातार जीवा" ही आरती......लिहिली.
   अ) आडकरांनी, ब) दिक्षितांनी, क) दासगणूंनी ड) धुमाळांनी

४) "तू राजाराम राजाराम" असे म्हणत जा असे बाबांनी......पत्नीला सांगितले.
   अ) साठ्यांच्या, ब) जोगांच्या, क) नुलकरांच्या, ड) खापर्ड्यांच्या

५) ......ही बाबांना नियमाने भाकऱ्या करून देत असे.
   अ) लक्ष्मीबाई ब) बायजाबाई क) गोखलेबाई ड) राधाकृष्णा आई

६) बाबांनी दोन शेळ्यांची किंमत रुपये......मालकाला दिली.
   अ) बत्तीस, ब) बारा क) सेहेचाळीस, ड) दहा

७) बाबांची अगदी प्रथम कुस्ती......बरोबर झाली होती.
   अ) रामगिरबुवा ब) बडे बाबा क) मोइद्दीन ड) माधवराव

८) मी आपणाकडे आज भोजनास येईन असे बाबांनी श्री. दाभोलकरांना......च्या दिवशी पहाटे स्वप्नात येऊन कळविले.
   अ) रामनवमी ब) दिवाळी क) विजयादशमी ड) होळी.

९) राधाकृष्णा आईच्या घराला शिडी लावून बाबा वरती चढले व दुसऱ्या बाजूने खाली उतरले तेव्हा शिडी लावणाऱ्याला बाबांनी......रुपये दिले.
   अ) दोन, ब) पाच, क) सात, ड) नऊ

१०) बाबांच्या कपाळावर प्रथम त्रिपुंड्र श्री......यांनी लावला.
   अ) पंडित, ब) जोग, क) नूलकर, ड) चोळकर

प्रेषक : श्री. माधव गोरे, विनायकबाग कुर्ला, ७०

## उत्तरे

१) –क, २) –क, ३) –अ, ४) –ड, ५) –ब, ६) –अ, ७) –क, ८)–ड
९) –अ, १०) –अ

# युगावतार श्री साईबाबा – ३

## (श्रीसाईबाबा सत्संग मंडळ, सुरतच्या सौजन्याने)

अनुवादक : श्री. चंद्रकांत दामोदर सामंत

श्री साईबाबा सत्संग मंडळाच्या विद्यमाने १९६३ साली दुसरा रामयज्ञ केला गेला त्यावेळेस शिरडी येथील द्वारकामाईतील अग्नि तेथे आपोआप प्रकट झाला.

श्रीसाईनाथांनी सांगितल्याप्रमाणे, "ही द्वारकामाई आपणा सर्वांची आई आहे. तिची पायरी चढणाऱ्यांच्या सर्व दुःखांचा नाश होतो; तसेच ती अत्यंत दयाळु असल्यामुळे आपल्या लेकरांचे अपराध पोटात घालते व सर्वांवर ती सारखीच माया करते. तिच्या पवित्र धुनीची उदी ही गुणकारी असून तिच्यामुळे सर्वांच्या दुःखाचा, क्लेशांचा परिहार होतो."

श्री. हसमुखभाई उर्फ श्री. जयमणीशंकरभाई हे मुळचे सुरत जिल्ह्यातील वालोद या गावचे वतनदार. परंतु धंद्याच्या सोयीसाठी त्यांचे अहमदाबाद येथे वास्तव्य असे. ते श्रीसाईबाबांचे निःसीम उपासक होते, तसेच सुरतच्या श्रीसाईमंदिराच्या हिशेबाचे कामकाजही ते पाहत. त्यांचा व्यवसाय हिशेबतपासनीसाचा असल्याकारणाने अर्थातच डोळे हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे एक महत्त्वाचे साधन होते.

दुर्दैवाने एकदा अहमदाबादहून गावी परतत असता आगगाडीत त्यांच्या डाव्या डोळ्यात अचानक बिघाड झाला व त्या डोळ्याने दिसणे साफ बंद झाले. उजवा डोळा हा अगोदरच मोतीबिंदुमुळे निकामी झाला होता. अशा रितीने दोन्ही डोळ्यांवर ओढवलेल्या आपत्तीमुळे त्यांची स्थिती मोठी केविलवाणी झाली. स्वतःच्या गावी परतण्याऐवजी मधेच त्यांना सुरत येथे उपचारासाठी उतरणे भाग पडले. तेथेच त्यांनी नेत्रतज्ञाकडून डोळ्यांवर उपचार सुरू केले. परंतु बऱ्याच प्रयत्नानंतर डॉक्टरांनी अभिप्राय दिला की, डावा डोळा हा काही बरा होण्याचे चिन्ह दिसत नसून त्याच्यावर यापुढे उपचार करणे व्यर्थ आहे. अशा रितीने डॉक्टरांनी आशा सोडून दिल्यामुळे हवालदिल झालेले हसमुखभाई गावी जाण्यासाठी निघाले. एवढ्यात त्यांना धुनीमाईच्या उदीची आठवण झाली. लगेच त्यांनी सुरतच्या साईमंदिरांतील धुनीतून थोडी उदी बांधून बरोबर घेतली.

वालोद गावी परतल्यानंतर उदी पाण्यात कालवून तिचा लेप दोन्ही डोळ्यांवर लावण्याचा क्रम हसमुखभाईंनी सुरू केला. बरोबर विसाव्या दिवशी त्यांना थोडा अंधुक प्रकाश जाणवला. त्यानंतर काही दिवसांनी ते परत सुरत येथे आले. तेथे त्यांनी आपले डोळे तज्ञाकडून तपासून घेतले. ह्यावेळेस डॉक्टरांनी अभिप्राय दिला की, "आता डोळ्यांच्या बाबतीत काही घाबरण्याचे कारण नाही, ते लवकरच बरे होतील." आणि

खरोखरच थोड्या दिवसात डाव्या डोळ्याप्रमाणे त्यांचा मोतीबिंदुमुळे निकामी झालेला उजवा डोळाही पूर्ववत् झाला. श्री बाबांच्या कृपेमुळे हसमुखभाईंच्या डोळ्यांचे वैभव त्यांना केवळ उदीच्या सेवनाने परत प्राप्त झाले. आंधळ्यांना दृष्टी देणाऱ्या व पांगळ्यांना पाय देणाऱ्या श्री साईनाथांना काय अशक्य आहे ?

# श्रीसाईबाबांचा कृपाप्रसाद

**श्री. चंद्रकांत दामोदर सामंत**

ठाणे येथील सत्पुरुष श्री गजानन महाराज उर्फ आण्णासाहेब पट्टेकर ह्यांचे एक परमभक्त श्री. रविंद्र शंकर खोपकर ( ८९ ब, नायगाव क्रॉस रोड, दादर, मुंबई १४ ) ह्यांना आलेला श्री साईबाबांच्या कृपेचा एक अनुभव वाचकांच्या माहितीकरिता खाली दिला आहे.

श्री. खोपकर हे काही मित्रमंडळींसह दि. ३–१–१९७५ रोजी शनिवारी दुपारी बारा वाजता एस. टी. ने मुंबईहून शिरडीला निघाले. ही त्यांची शिरडीला प्रथमच भेट होती. प्रवासातील सावधगिरी म्हणून जवळचे पैसे त्यांनी निरनिराळ्या जागी विभागून ठेवले होते; त्यापैकीच सत्तर रुपये त्यांनी आपल्या खिशातील प्लॅस्टिकच्या पाकिटात श्रीराममारुतीचा फोटो, श्री गजानन महाराजांचा फोटो, श्री सप्तश्रृंगीदेवीचा फोटो व श्री गजानन महाराजांनी स्वहस्ताक्षरात दिलेल्या मंत्राचा कागद ह्यांच्या आडो-शाला ठेवले होते. शिरडीस पोहचल्यावर संस्थानच्या कचेरीत जागेची चौकशी करते-वेळी त्यांना पैशाच्या पाकिटाची आठवण झाली. पण खिशात त्यांना पाकिट सापडेना. धावाधाव करून सर्वजण एस. टी. स्टँडवर आले व तेथे सर्वांनी मिळून पाकिटाची कसून शोधाशोध केली. सरतेशेवटी बस कंडक्टरच्या परवानगीने ते बसमध्ये चढले, तेव्हा त्यांना ते पाकिट त्यांच्याकडे मिळाले. बस कंडक्टरला श्री. खोपकरांनी पाकि-टाच्या सर्व खाणाखुणा पटविल्या पण त्या पाकिटात पैसे नव्हते असे कंडक्टरने त्यांना निक्षून सांगितले. श्री. खोपकरांनी सर्वांसमक्ष पाकिट उघडून दाखविले, तेव्हा त्यांना त्यात त्यांचे सत्तर रुपये जसेच्या तसे आढळले. हा श्री साईनाथांचा प्रेमळ कृपाप्रसादच नव्हे काय ?

# श्रीसप्तश्रृंगी देवी व श्रीसाईबाबा

श्री. मधुकर प्रभाकर दिक्षित
पुजारी, श्रीसप्तश्रृंगगड, वणी, जि. नाशिक

श्री साईबाबांनी शामा ऊर्फ माधवराव देशपांडे ह्यांना नवस फेडण्यास श्रीसप्तश्रृंगगडावर पाठविले होते—(श्रीसाई सच्चरित अध्याय ३०, श्लोक ७३)—त्या शिवाय श्री दासगणु महाराज, श्री. नानासाहेब चांदोरकर व इतर भक्तांना श्री बाबांनी देवीचे दर्शनास गडावर पाठविले होते. आम्ही दीक्षित पुजारी पिढयान् पिढया गडावर आहोत. अलिकडे मुंबई बाजूचे लोक मोठया प्रमाणावर दर्शनास येतात. ठाणे येथील प्रसिद्ध सत्पुरुष श्री गजानन महाराज पट्टेकर यांच्यामुळेच हे लोक गडावर येतात.

तारीख २८ व २९ सप्टेंबर १९७१ (नवरात्र) ह्या दिवशी गडावर पाऊस फार होता. गडावर गर्दीमुळे कोणाकडेही जागा नव्हती. त्याच दिवशी गडावर रात्री श्री. रत्नाकर गुरुजी हे आले होते. त्यांचे बरोबर त्यांची बायको, मुलगे, मुलगी नयना व इतर मंडळी होती. त्यांनी नांदुरीचे पायथ्याशी असलेल्या बाबुशेट हॉटेलवाले ह्यांच्या सांगण्यावरून श्री गजानन महाराजांचे दर्शन घेतले व मला महाराजांनी त्या मंडळींना जागा करून देण्यास सांगितले. आम्ही त्यांना जागा खाली करून दिली व स्वयंपाक घरात निजण्यास गेलो.

दुसरे दिवशी सकाळी मला गुरुजींनी नैवेद्यासाठी पुरणपोळीचे भोजन करण्यास सांगितले, त्याप्रमाणे मी व्यवस्था केली. स्वयंपाक होत आला होता. त्यावेळी रत्नाकर गुरुजी म्हणाले, "मला आता शिरडीस गेले पाहिजे. कलेक्टर व प्रांतसाहेब येणार आहेत. मी शिरडीसच प्रसाद घेईन." असे सांगून ते सर्वजण निघाले. तेवढयात त्यांची मुलगी नयना आजारी नसताना एकाएकी बेशुद्ध पडली. सर्व मंडळी काळजीत पडली. मी सांगितले, "संत गजानन महाराज येथे असताना काळजी करू नका. ते देवीला सांगतील." तेवढयात श्री गजानन महाराज देवीचे कुंकू व गाणगापुरचे भस्म घेऊन आले. मुलीचे कपाळास कुंकू लावले, तोंडात गाणगापुरचे भस्म टाकले व मुलीस म्हणाले, "उठ, थांबू नकोस, शिरडीला जा, बाबा वाट पहात आहेत." मुलगी चांगली शुद्धीवर आली. तिने व तिच्या आईने महाराजांचे पाय घट्ट धरले. त्या दिवसापासून मुलीची तब्येत चांगली सुधारली. आजपर्यंत तक्रार नाही. तिचे लग्नही झाले व चांगले ठिकाण मिळाले. श्री गजानन महाराज म्हणतात, "श्री साईबाबा व त्यांची आवडती देवी श्री सप्तश्रृंगी ह्यांचे नामस्मरण करा, इष्ट मनोरथ पूर्ण होतील."

❋

# बाबांची कृपा

श्री. दशरथ रामजी तळेकर
मुकेश मिल कंपाउन्ड, व्हिक्टोरिया बंदर रोड,
पी / ६ कुलाबा, मुंबई–५

गेल्या वर्षीच घडलेली ही एक सत्यकथा आहे. ता. १ सप्टेंबर १९७५ ला रजा घेऊन मी 'गणपती उत्सवा' निमित्त मुंबईहून गावी गेलो होतो. माझे गाव कुलाबा जिल्ह्यातील रोहा तालुक्यात असून ते 'रोहा' या शहरापासून १३ मैल दूरवर दाट झाडीत उंच टेकडीवर फार पूर्वीपासूनच वसलेले आहे. गावाच्या पायथ्याला अरबी समुद्राची निळी खाडी आहे. माथ्याला उंच उंच डोंगर, झाडाझुडपांनी भरलेले आहेत. माझे साठ घराचे छोटसे टुमदार 'खाजणी' गाव टेकडीवरून समुद्राच्या पाण्यात डोकावून आपली प्रतिमा त्यात पहात आहे असेच नवीन व्यक्तीला वाटल्याशिवाय रहात नाही.

माझ्या जन्मभूमीची मला विलक्षण ओढ आहे आणि त्या ओढीमुळेच मी मुंबईला नोकरीसाठी स्थायिक असलो तरी प्रत्येक सणाला गावी गेल्याशिवाय रहावतच नाही. गेल्या वर्षी मी गावी गेलो तेव्हा 'गणपती उत्सव' चालू होता.

दिवस पावसाळ्याचे होते. धरणी मातेने हिरवा शालू परिधान केला होता. त्यामुळे तिचे रूप आकर्षक दिसत होते. झाडे, वेली यांच्यामध्ये उंचउंच वाढण्याची जणू स्पर्धाच लागली होती. गावाशेजारचा ओढा ईश्वराचे गुणगायन करीत समुद्राला भेटायला घाईघाईने जात होता. शेतातील रोपे (भात) अल्लड वाऱ्याच्या तालावर स्वैरपणे नाचताना दिसत होती. झाडे वेली सुद्धा माना डोलवून आपला आनंद एक-मेकांना सांगत होती. मधून मधून काही काही झाडांच्या शेंड्यांवर पक्ष्यांचे थवेच्या थवे गप्पागोष्टी करताना दिसत होते. एकंदर निसर्गाचे नयनमनोहर दृश्य पाहूनच माझे मन अत्यानंदाने हरखून गेले.

मुंबईच्या गजबजलेल्या व धावपळीच्या शहरात बेचैन झालेल्या माझ्या मनाला एक नवीनच हुरूप आल्यासारखं वाटलं. मी मनोमन सुखावलो. घरात पाऊल टाकताच समोरच भिंतीला टांगलेल्या 'साईबाबांच्या आशीर्वाद फोटोला' विनम्र भावे वंदन करून तेरा मैल पायी चालत आलेला शीण (थकवा) घालविला. पुढे नंतरचा उगव-णारा प्रत्येक दिवस मी मजेत घालवित होतो. मधून मधून माझा सख्खा लहान भाऊ 'साईनाथ' याच्या बरोबर आमची स्वतःची गुरे घेऊन गावापासून दूर एक मैलावर 'रानमाळावर' जात असू.

सोमवार ता. ८ सप्टेंबर १९७५ या दिवशी गणपती उत्सव (सण) असल्यामुळे मी माझा भाऊ साईनाथ यास म्हटले, 'साईनाथ! आज तू गुरे घेऊन माळावर जाऊ

नकोस. मी एकटाच गुरांना घेऊन माळावर जातो. आज सण आहे. तेव्हा तू नाच, खेळ, मजा कर. या सणाच्या निमित्ताने तरी रजा घे. नाही पेक्षा तुला सुटी केव्हा मिळणार !''

माझ्या बोलण्याने साईनाथला खरोखर खूप आनंद झाला, आणि तो गावात खेळण्यासाठी निघून गेला. मी सुद्धा आईला बाबांना सांगून व 'साईनाथ फोटोला' नमस्कार करून आमची गुरे घेऊन जंगलाचा रस्ता धरला. अर्धा तास चालल्यावर 'सागवन' जवळ आले. तिथे मी गुरांना गवत खाण्यासाठी मोकळी सोडून दिली, आणि मी सोबत नेलेले मजेदार गोष्टीचे पुस्तक गवतावर घोंगडी अंथरून (पसरून) वाचत बसलो. या सणाच्या दिवशी मी जेवण सुद्धा भरपूर जेवून आलो होतो. त्यामुळे मला जांभया यायला सुरुवात झाली. म्हणून मी घोंगडीवर उताणा झोपून पुस्तक वाचीत होतो.

मंद मंद वाऱ्याच्या झुळूकी बरोबर मला थोड्याच वेळात गाढ झोप लागली, आणि मला एक स्वप्न पडले. स्वप्नात मला एक वयोवृद्ध गृहस्थ दिसले. त्यांची दाढी वाटली असून ती भरदार व पांढरी स्वच्छ दिसत होती. चेहऱ्यावर विलक्षण तेज झळ-पत होते. अंगात एक पांढरा सदरा घातलेला होता. हातात दोन फूट उंचीची एक काठी होती. कमरे भोवती एक पांढरा स्वच्छ पंचा गुंडाळलेला होता. असा तो साधारण साठी ओलांडलेला म्हातारा माझ्या स्वप्नात येऊन मला म्हणाला,

"बेटा ! उठ लवकर संध्याकाळ झाली आहे. तुझी सगळी गुरे कंपाउंडच्या पलिकडे शेतात (भातात) जात आहेत. उठ लवकर ! आणि त्यांना घेऊन ताबडतोब घरी जा."

माझ्या कानात तापवून ओतलेल्या तेलासारखे त्या म्हाताऱ्याच्या तोंडचे शब्द आरपार घुसले आणि माझ्या झोपेचा भंग झाला. मी धडपडत उठलो. हातातील घड्याळाकडे पाहिले. पावणे सात वाजले होते. अंधाराचे साम्राज्य सुरू होण्याला फक्त अर्धा तासच बाकी होता. दुपारी आनंदात गप्पागोष्टी करणारे पक्षी आपापल्या घरट्यात जाऊन बसले होते. दुपारी वाहणारा चोरटा वारा सुद्धा शांत झाला होता. हिरवा शालू नेसलेली धरणीमाता सुद्धा म्लान दिसत होती,

मी उठून आजूबाजूला पाहिले. स्वप्नात दिसणारा पांढराशुभ्र दाढीवाला म्हातारा कुठेच दिसत नव्हता आणि शिवाय माझी गुरे सुद्धा कुठेच दिसत नव्हती. मला काळजी वाटू लागली. घोंगडी खांद्यावर घेऊन मी बावरलेल्या नजरेने चोहोकडे दृष्टी फिरवीत पुढे पुढे चालत गेलो. भीतीने मनात घर केले होते. रातकिड्यांची किर्‌किर् ऐकायला येऊ लागली होती. आकाश स्वच्छ, निरभ्र दिसत होते. मी पुढे पुढे चालत गेलो. तोच माझी सगळी गुरे रानमाळांचा कंपाउन्ड ओलांडून एकमेकांच्या पाठीवर 'कदम बुवांच्या' शेताकडे (भात खाण्यास) नुकतीच जात होती.

मी लगबगीने पुढे झालो. गुरांना मागे वळविले आणि घरचा रस्ता धरला. गुरांच्या पाठीमागून घराची वाट चालत असताना माझे विचारचक्र सुरू झाले. "माझ्या

स्वप्नात येऊन दुसऱ्याच्या शेतात गुरे जात आहेत, संध्याकाळ होत आली आहे, उठ लवकर घरी जा !" असे मार्गदर्शन करणारा असा गृहस्थ कोण बरे असावा ? भूत...? छे ! भूत असते तर त्याने मला निश्चित घाबरविले असते.

त्यावेळी थोडा वेळ जर अजून झोपून राहिलो असतो तर माझ्या गुरांनी दुसऱ्याच्या शेतातील संपूर्ण भात (पिक) खाऊन त्याचा नाश केला असता. शिवाय मला जेवणाचा अंमल चढला होता. म्हणजे मी माझ्याहून लवकर जागा झालो नसतोच आणि जर का आणखी एक तासांनी जागा झालो असतो तर मला सभोवताली अंधाराचे साम्राज्यच दिसले असते. मग तेव्हा गुरे तर मिळाली नसतीच. पण भीतीने मी अर्धमेला झालो असतो हे खास. बरं तिथून जोरात हाक मारून गावापर्यंत आवाज पोहोचणे कठिण...नव्हे अशक्य होते. याशिवाय घरी आणि गावात माझ्यासाठी सर्वांनाच काळजी वाटून बरेचजण मला शोधायला रानात आले असते ! म्हणजे सगळ्या बाजूने संकटेच उद्भवली होती.

मी घरी येऊन गोठ्यात गुरांना बांधली आणि सारी हकिगत माझ्या आईला सांगितली. तेव्हा आई म्हणाली, 'दशरथ ! खरोखर आपल्या 'साईनाथ बाबांचीच' कृपा म्हणायची ही. बाबांनीच तुला स्वप्नात फकिराच्या वेषात येऊन दर्शन दिले, आणि येणाऱ्या संकटापासून वाचविले आहे.'

मी माझी ही कथा जेव्हा जेव्हा माझ्या मित्रांना, नातेवाईकांना सांगतो तेव्हा ते सुद्धा मला म्हणतात. 'तू साईनाथ महाराजांचा भक्त आहेस. म्हणूनच तुझ्यावरची संकटे टळून जातात.'

खरोखर 'साईनाथ बाबांची' किती अलौकिक कृपा दृष्टी माझ्यावर आहे. ८ सप्टेंबर १९७५ चा 'अविस्मरणीय दिवस' माझ्याच नव्हे तर माझ्या कुटुंबासह आमच्या स्मरणातून केव्हाच जाणार नाही.

"साईनाथ महाराज की जय" ※

---

### श्री गजानन महाराजांचा पत्ता—

● श्री साईलीला मे १९७६ च्या अंकात आम्ही सद्गुरु श्री गजानन उर्फ अण्णा साहेब पट्टेकर ठाणे यांचे संबंधीचा माहितीपूर्ण लेख प्रकाशित केला होता. तो वाचून अनेक वाचकांनी त्यांच्या पत्याची आमच्याकडे विचारणा केली. त्यांना उत्तरे यापूर्वीच पाठविली गेली. सर्वांसाठी श्री महाराजांचा पत्ता असा–

श्री गजानन महाराज, द्वारा श्री. गिरीधर तेली घरक्रमांक ३९ टेंभी नाका, ठाणे, चौकशी व दर्शनाची वेळ दुपारी ३–३० ते ५–३० दूरध्वनी क्रमांक ५९३१५७ श्री. अनंतराव पालकर ठाणे यांचेकडे.

---

श्री साईनाथांच्या शिरडी येथील वास्तव्याच्या काळात घडलेल्या महत्त्वाच्या घटना कै. हेमाडपंत कृत "श्रीसाईच्चरित"च्या आधारे

# संतश्रेष्ठ भगवान साईबाबा जीवनातील ठळक घटना

| क्रमांक | तारीख तिथी | घटना | अध्याय क्रमांक | ओवी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | शके १७६० (इ.स. १८३८) | श्री साईनाथांचा स्थूलमानाने जन्म | १० | ४३ |
| २ | १८५४ | सोळाव्या वर्षी शिरडीस प्रथम प्रकट | १० | ३६ |
| ३ | १८५८ | विसाव्या वर्षापासून पुढे साठ वर्षे शिरडीत वास्तव्य | १० | ३९ |
| ४ | १८५९ | श्री. आण्णासाहेब दामोळकरांचा जन्म | ५३ | १७३ |
| ५ | १८७८ | भक्त श्री बाळाराम धुरंधरांचा जन्म | ५१ | १९० |
| ६ | १९०९ | भक्त श्री भीमाजी पाटीलास कफक्षयापासून आराम | १३ | ३४ |
| ७ | २ नोव्हेंबर १९०९ | श्री. काकासाहेब दीक्षितांना श्रीबाबांचे प्रथम दर्शन | ४ | १५७ |
| ८ | ९ डिसेंबर १९०९ | दीक्षित वाड्याचा पाया | ४ | १६१ |
| ९ | १० डिसें० १९०९ | १) वरील गोष्टीस श्रीबाबांची अनुज्ञा<br>२) चावडीतील शेजारती प्रथम सुरू | ४ | १६४ |
| १० | १९१० पासून | हंडीयोग समाप्ती-नैवेद्य प्रकार सुरू | ३८ | १०७ |
| ११ | १९१० धनतेरस | लोहाराचे पोर आगीतून काढले | ७ | ७३ |
| १२ | १९१० पासून | श्री. दासगणूंची कीर्तने | २६ | ५९ |
| १३ | डिसेंबर १९१० | 'हेमाडपंत' शिरडीत प्रथम दाखल | २ | ११२ |
| १४ | नाताळ १९१० | भक्त श्री. लाला लखमीचंदाचे शिरडीस प्रयाण | २८ | २३ |
| १५ | १९११ | शिरडीत प्रथम रामजन्मोत्सव | ६ | ५९ |
| १६ | १९११ | दीक्षित वाड्यात गृहप्रवेश | ४ | १६६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रामनवमी | | | |
| १७ | १९११ | मशिदीत सभामंडप | ६ | १२७ |
| १८ | १९१२ | मशिदीत स्थित्यंतर | ५ | ९७ |
| १९ | एप्रिल १९१२ | भक्त श्री. बाळाराम धुरंधराचे शिरडीत प्रथम आगमन | ५१ | १९९ |
| २० | शके १८३४ श्रावण शुद्ध पर्वकाळी | निंबातळी पादुका स्थापिल्या | ५ | ५९ |
| २१ | गुरुवार दि. २ एप्रिल १९१४ | भक्त श्री. बाळासाहेब देव यांस स्वप्नात दर्शन | ४१ | १६० |
| २२ | डिसेंबर १९१५ | भक्त सौ. तर्खडांनी पाठविलेला उष्टा पेढा खाल्ला | ९ | १४४ |
| २३ | १९१६ | भक्त श्री. गोपाळनारायण आमडेकरांचा आत्महत्येचा विचार | २६ | १२२ |
| २४ | १९१६ | मद्रासी भजनी मेळा शिरडीत | २९ | २ |
| २५ | विजया- दशमी १९१६ | देहान्ताची पूर्वसूचना | ४२ | २० |
| २६ | १९१७ | 'हेमाडपंतांना' स्वप्नात दर्शन | ४० | ११३ |
| २७ | फाल्गुन शुद्ध पौर्णिमा १९१७ | भक्त श्री. आप्पासाहेब कुलकर्णी ठाणे, ह्यांस फकीराच्या वेषात दर्शन | ३३ | १४५ |
| २८ | १९१७ | भक्त श्री. हरिभाऊ कर्णिक, डहाणू ह्यांचा एक रुपया नाशिक येथे वसूल | ३३ | १९९ |
| २९ | शके १८४० आश्विनशुद्ध दशमी १९१८ | निर्याण | १० | ४२ |

# अगाध-लीला

— सौ. सरला सू. गर्जे
८०, शिवाजी नगर, पुणे ५.

साई नामी आहे मोठी किमया ।
संकटे जाती लयाला ॥

बाबा भक्तांच्या हाकेला किती लवकर धावतात याचे हे सुंदर उदाहरण आहे.

माझ्या धाकट्या दोन मुली नुकत्याच गोवराच्या तापातून बऱ्या होऊन उठल्या म्हणून मी यजमानांबरोबर मुलींना घेऊन कोंडणपुरास देवीच्या दर्शनास जावयाचे ठरविले. पहाटे चारचा गजर होताच उठून सर्व आवराआवर केली व डबा घेऊन स्वारगेट - एस. टी स्टँडवर पोहोचलो. गाडी लेट झाल्याने जवळ जवळ तासभर बाकावर ताटकळत बसलो. गाडी येण्याची वेळ होताच स्पीकरवरून सांगण्यात आले की, कोंडणपुरास जाणारी गाडी फलाट नं. ४ ला न लागता नं. ३ ला लागणार. तेव्हा लोकांनी एकच गर्दी केली; व नं. ३ चा सर्व बाक भरला. आम्ही बाकाचे पुढील बाजूस उभे राहिलो. गाडी आली. कंडक्टरने तिकिटे देण्यास सुरवात केली. बाकापुढील गर्दी पाहून कंडक्टरने बाकापासून लाईन धरण्यास सांगितले व मध्ये उभे राहिल्यास तिकीट दिले जाणार नाही, असे चक्क बजावले. उभे असलेल्या लोकांनी खूप गयावया केली व 'येऊन तास होत आल्याचे' सांगितले. परंतु नकार मिळाला. निराश होऊन लोकांनी पाठीमागे लाईन धरली. मी बाकाशेजारी तशीच उभी राहिले. कंडक्टर माझ्यापुढून निघून गेला. मी हताश होऊन मनोमन साई-बाबांचा धावा करू लागले आणि काय आश्चर्य !

पुढे गेलेला कंडक्टर पटकन् माझ्याजवळ आला व "बाई आपणास किती तिकिटे हवीत ?" म्हणून सहानुभूतीपूर्वक चौकशी करू लागला.

मी मोठ्या आनंदाने चार तिकिटे घेतली व एस. टी. त जाऊन बसले ती अगदी भारावलेल्या मनःस्थितीत.

बाबांच्या नामःस्मरणात किती दिव्य शक्ति आहे असा विचार करीत मी मनोमन साईबाबांचे चरणकमली नतमस्तक झाले.

आमची पुढली ट्रीप आनंदात पार पडली व देवीचे दर्शन घेऊन घरी सुखरूप परतलो.

※

## अमोल भेट

● मुले असली तरच घराला शोभा. मुले नसली तर घर कसले ? परंतु दुर्दैवाने माझी मुलगी ह्या सुखाला पारखी झाली होती. जीवनाविषयी ती कमालीची उदासीन बनली. तिच्या जीवनावर दुःखाचे सावट पसरले. मला वाईट वाटत होते. मी काय करू शकत होते ? तिची संसारवेल फुलाशिवायच कोमेजणार होती. पण मी धीर सोडला नव्हता. बाबांवर माझी अढळ श्रद्धा होती. एक ना एक दिवस बाबा माझे दुःख जाणतील असे वाटत होते. मी तिला बाबांची पोथी वाचण्यास व बाबांची मनापासून पूजा करण्यास सांगितले. अन् चमत्कार घडावा तसा निराशेच्या अंधारात आशेचा किरण दिसला. नवजात बालकाची चाहूल लागली. बाबांनी प्रचीती दाखवली होती. बाबांवर निस्सीम भक्ति करणाऱ्या भक्तांना बाबा नेहमीच अनमोल भेट देतात.

**– सौ. उषा प्रभाकर मुळे, शिर्डी**

## कलियुगात पावणारा देव !

**श्री. सुरेश शांताराम सातपुते**
जाम बिल्डिंग, लालबाग.

हे कलियुग आहे. ह्या युगात म्हणे देव दिसत नाही. पण मी म्हणतो हे खोटे आहे ! बाबा आजही अनेकांना दिसतात...पावतात ! बाबांनी भक्ताची मागणी किंवा लाड पुरविले नाही, असा एकही भक्त मिळणार नाही. भक्ताने बाबांना हाक मारली किंवा न मारली तरी, बाबा भक्ताचे संकट ओळखून, त्याची सुटका करण्यास तेथे हजर असतात. मग कलियुगात देव दिसत नाही हे विधान खोटे नाही का ? तितकीच गाढ श्रद्धा असली, आणि थोडी बहूत सबुरी असली, म्हणजे बाबा धावून येतातच असा माझ्याप्रमाणे असंख्य लोकांचा अनुभव आहे. बाबांनी स्वतःच याबद्दल सांगितले होते;

> शरण मज आला, आणि वाया गेला ।
> दाखवा, दाखवा ऐसा कोणी ॥

मला तर वाटतं, असा, कोणीही या जगाच्या पाठीवर नसेल की, ज्याने श्रद्धायुक्त अंतःकरणाने बाबांना हाक मारली व...बाबा धावून आले नाहीत ! मीही एकदा

बाबांना अशीच हाक मारली होती.– त्यावेळी देखील बाबा धावून आले होते. तो प्रसंग २२।२३ वर्षे झाली तरी अजूनही माझ्या डोळ्यापुढे उभा रहातो––

मी त्यावेळी फारतर १०।१२ वर्षांचा असेन. रात्री ११ ची वेळ होती. आम्ही घरातील सर्व लोक जेवून खाऊन झोपण्याचे तयारीने बसलो होतो. आमची आईही बसली होती... इतक्यात आमचे आईची, पायाचे गुडघ्याची वाटीच कोठेतरी सरकून मांडीत अदृश्य झाली त्यामुळे मात्र, पायाची बिलकूल हालचाल करता येईना. हॉस्पिटलमध्येच न्यावे लागेल असे दिसत होते. पण, पाय दुमडणेही शक्य नसल्याने उठता येणे अशक्य होते, त्यामुळे रुग्णवाहीनी आणूनच, हॉस्पिटलमध्ये न्यावे लागेल हे स्पष्ट होते.

वास्तविक, मी त्यावेळी साईभक्त नव्हतो. पण त्या दरम्यान बाबांविषयी, कुठले तरी एक पुस्तक माझ्या वाचनात आले होते. त्यांत बाबांचे कृपादृष्टीचे असेच काही चमत्कार वर्णिलेले होते. आपणास ठाऊक आहेच की, संकट समयी माणसाचे अंतःकरण वेगळ्याच स्थितीत असते.

मी अगदी कळवळून त्यावेळी बाबांचा धावा केला व म्हटले – जर आमचे आईची गुडघ्याची वाटी जागेवर येऊन बसली तर मी हा प्रसंग मासिकातून प्रसिद्ध करीन.

या गोष्टीस काही मिनिटेही झाली नसतील इतक्यात तेल घेऊन पायास चोळावे अशी मला इच्छा झाली. मी लगेच तेल घेतले व पायाचे घोटास चोळण्यास सुरुवात केली व सहज पायाचे मधले बोट ओढले – तो काय आश्चर्य – गुडघ्याची वाटी खटदिशी येऊन जाग्यावर बसली.

वास्तविक ही गोष्ट पूर्वी का न सुचावी ? बरे ! पायाचे मधलेच बोट का ओढावे ? ह्या प्रश्नांची उत्तरे मला तरी काही देता यायची नाहीत ! ती गोष्ट माझे हातून बाबांनीच करविली याबद्दल मला अगदी तिळमात्रही शंका नाही.

दुसरी गोष्ट, बाबा कधीच रागावत नाहीत. मी हा चमत्कार प्रसिद्ध करीन असे म्हटले त्यासही बराच अवधि लोटला. वास्तविक देव नवस फेडण्याची १२ वर्षे वाट पहातो असे म्हणतात ! पण मी हा चमत्कार प्रसिद्ध करण्यास चालढकल केली म्हणून बाबा मजवर रागावले नाहीत. आमचे आईस त्या वेळेपासून आजतागायत गुडघ्यास कसलाच उपद्रव झाला नाही. कारण बाबांचे ठायी भक्ताबद्दल फक्त प्रेम आहे, तेथे रागाला जागाच नाही तर बाबा माझ्यावर रागावणार कसे ?

या कलियुगातही झटकन् पावणारा देव म्हणजे बाबा ! असा माझा व इतर लोकांचा अनुभव आहे. फक्त श्रद्धा व थोडी बहुत सबुरी या दोन गोष्टी असल्या म्हणजे बस्स !

✻

# माझे बाबा – श्रीसाई

श्री. के. रा. धालगांवकर
रेल्वे कॉलनी प्लॉट नं. ४६ राणाप्रताप नगर, नागपूर–१०.

श्री साईबाबांचे समाधिकालापूर्वी १-२ वर्षे मी माझे वडिलांचे समवेत शिरडीस गेलो असता मला श्री साईबाबांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. त्यावेळी माझ्या वडिलांनी बाबांना नमस्कार करून मलाही श्रीबाबांना नमस्कार करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी श्रीबाबांना नमस्कार तर केलाच परंतु श्रीबाबांच्या हातचा खडीसाखरेचा प्रसादही मला खाण्यास मिळाला. त्यावेळी माझे वय साधारणपणे पाच वर्षांचे असावे. त्यानंतर वीस वर्षे कालावधी उलटला. माझा शिक्षणकाल संपून मी सरकारी नोकरीस लागलो. या कालावधीत श्री बाबांचे मला संपूर्णपणे विस्मरण झाले. मी पुलगावला नोकरीवर होतो. इ. स. १९५३ साली माझी बदली मुंबईस झाली. मी मुंबईस तीन वर्षे काढली. मुंबईस असताना तेथील कर्मचारी वर्गात श्री साईबाबांचा उल्लेख विशेषकरून मला ऐकण्यास मिळत असे. माझ्या २५–३० वर्षांचे कालावधीत श्री साईबाबा कोण, कुठे असतात, याचे पूर्णतया विस्मरण झाले. माझे सहकारी वर्गाकडून मला सतत श्री बाबांचे संबंधात ऐकावयास मिळे. मी मनात म्हणत असे "असेल कोणी एखादा मुसलमान फकीर–आपल्याला त्याच्याशी काही कर्तव्य नाही, असे म्हणून दुर्लक्ष करीत असे. १९५६ साली माझी बदली परत पुलगावला झाली. तेथे कामावर हजर झाल्यानंतर एक महिन्याची रजा काढून पंढरपूरला आणि स्वतःचे गावाकडे जाण्याचा निश्चय केला आणि त्याप्रमाणे मी सहकुटुंब प्रवासास निघालो. आगगाडीत बरेच प्रवासी कोपरगावाहून शिरडीस जाणारे भेटले. त्या प्रवाशांचे तोंडूनही श्री साईबाबांची माहिती ऐकली. माझे मनात उत्सुकता निर्माण झाली व श्री साईबाबा हे प्रकरण आहे तरी काय हे जाणून घेण्याची इच्छा झाली व मी कोपरगावला उतरुन शिरडीस केवळ उत्सुकता म्हणून जाण्याचे ठरविले. सकाळी पहाटेस कोपरगावला गाडी पोहचत असल्यामुळे सकाळी जावे आणि शिरडीला काय प्रकार आहे तो पहावा आणि ताबडतोब दुसऱ्या गाडीने परतावे म्हणून शिरडीस गेलो. बरोबरच्या सामानाची व्यवस्था करून स्नान करूनच मंदीरात जाण्याचा विचार केला. स्नान आटोपले व मंदिरात गेलो मात्र, समोर बाबांची भव्य मूर्ती पाहताच मी भांबावून गेलो. फार फार पूर्वी मी या मूर्तीस जिवंत पाहिले असे आठवले. पण केव्हा, कुठे, कसे, कोणाबरोबर हे काही पुष्कळ प्रकारे स्मरणशक्तीला ताण देऊनही आठवेना. परंतु मूर्ती पाहिली तीही जिवंत मूर्ती. तीही माझ्याशी बोललेली, माझ्या डोकीवर हात ठेवलेली इतकेच नव्हे तर मला प्रसाद म्हणून खडीसाखर खायला देणारी श्री बाबांची मूर्ती. मला अकस्मात आठवले की

अगदी लहानपणी वडिलांचे बरोबर श्री बाबांना पाहिले. त्यानंतर जवळ जवळ ४० वर्षांचा काळ लोटला. माझा प्रवास संपवून पुलगावला आलो आणि श्री बाबांचे दर्शनाने मन अगदी भारावून गेले—माझे मन श्री बाबांचेकडे ओढ घेऊ लागले. पुलगावला ४–५ स्नेही मंडळी जमवली व श्री बाबांचे प्रत्येक गुरुवारी भजन सुरू केले. आमचे भजनी मंडळ वाढले तसे गोकुळ अष्टमी, रामनवमी, दसरा हे उत्सव करण्याचे ठरविले. भक्त मंडळीकडून प्रतिसाद मिळत गेला. भरीस भर म्हणून की काय आम्हा भक्तजनास कै. परमपूज्य दासकिसन यांचे मार्गदर्शनाने भक्त मंडळी भारावून गेली. कै. दासकिसनबाबा यांची प्रेरणा आणि श्री साईबाबांची भक्तीची ज्योत सतत तेवत ठेवण्याबाबत केलेला उपदेश यांनीं सर्वांची मने आकर्षित झाली. श्री साईभक्त कै. दासकिसन यांनी आम्हा भक्तजनास दिलेले (भक्तीच्या सामर्थ्यांनी काढून) खडे व गोड उदी याची चिरंतन स्मृती आमच्या अन्तःकरणास श्री साई भक्तीची प्रेरणा देत राहील. प्रतिवर्षी वर सांगितलेले उत्सव मोठ्या प्रमाणात होत गेले. आणि अद्यापही होत आहेत. अशाच एका वर्षी दसऱ्याचा महोत्सव साईभक्त श्री किराड यांचे घरी करण्याचे योजिले. प्रत्यक्ष विजयादशमीचे दिवशी श्री साईबाबांना अभिषेक, पूजा वगैरे संपवून सकाळचे ९-१० वाजण्याचे सुमारास भजनी मंडळींनी भजनाला सुरवात केली. भजन दुपारी १–२ वाजेपर्यंत करून आरती झाली व नैवेद्य समर्पण करून जेवणाकरिता पाने मांडली. इतक्यात मला माझ्या मनास वाटू लागले की श्री साईबाबा जेवावयास यावेत आणि खात्रीपूर्वक येतील असा आत्मविश्वास वाटू लागला. एकीकडे पाने मांडून जेवणाकरिता घाई सुरू झाली. मला काही स्वस्थ बसवेना. अस्वस्थता जाणवू लागली. माझे दुसरे स्नेही साईभक्त श्री. दादासाहेब गडकरी यांना एका बाजूस बोलावून त्यांना मी सांगितले की "आज श्री साईबाबा आपल्याकडे जेवावयास येतील." सर्वांना कोणासच विश्वास वाटेना. परंतु माझा आत्मविश्वास व माझे आंतरमन सांगे की—माझे बाबा आल्याविना राहणार नाहीत– "कौन रूपमें भगवान आते, मत कर तू अभिमान रे ॥" माझे सारे लक्ष बाहेर रस्त्यावर होते. इतके होत आहे तोच एक धनगर, अतिशय म्हातारा हातपाय थरथर कापणारा, अंगात शक्ति नाही, खांद्यावर फाटकी घोंगडी काठी टेकीत टेकीत बाहेर उभा असलेला पाहिला. मी धावतच बाहेर गेलो. त्याला पाहताच माझे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. तो म्हातारा मला म्हणाला "कुछ खानेकु परसाद मिलेगा" मी म्हटले अवश्य मिळेल. त्या म्हाताऱ्यास आत बोलावून घेतले. पोटभर जेऊ घातले. तो जाण्यास निघाला. माझे इतर स्नेही श्री. किराड, श्री. गडकरी या सर्वांना विस्मय वाटला व त्यांनाही आनंद झाला. जाता जाता तो म्हातारा तोंडाने म्हणत होता की "अल्ला मालीक तुम्हारा भला करेगा" आणि म्हातारा जाऊ लागला. बहुतेकाना कुतुहल निर्माण झाले, आणि म्हातारा कोठे जातो हे पाहण्याची उत्सुकता निर्माण

झाली. साधारणपणे तो म्हातारा १-२ फर्लांग जाईतो आमच्या दृष्टीपथात होता. पण पुढे आम्हा सर्वांचे डोळे दिपले आणि तो अदृश्य झाला. त्याला पाहण्याकरिता बरेच लोक सायकलीवरून निघाले परंतु तो कोठेच दिसला नाही. आम्ही सर्वजण परत येऊन श्री बाबांच्या लीलेवर गप्पा मारीत यथेच्छ जेवण केले. या घटनेवर वाचकांचा विश्वास बसो अथवा न बसो. माझा मात्र पूर्णपणे विश्वास आहे. मी आता सेवानिवृत्त असून हल्ली नागपूरला स्थायिक आहे. मी नित्य प्रतिगुरूवारी श्रीबाबांची भक्तीपर भजने व आरती करीत असून त्यात माझे सर्व कुटुंबीय अन्तःकरणपूर्वक सहभागी होत असतात.

# माझे बाबा

—सौ. उषा सुभाष कर्णिक
दिवाणजी वाडा भद्र,
अमदाबाद

" जरी मी ध्येय सोडोनी निजधामास पातलो
नवसास नित्य पावेल भक्ता माझी समाधी ॥
धावेन भक्तासाठी हाकेला भक्त संकटी
जिवंत मी नित्य आहे घ्यावी माझी प्रचिती ही ॥

हे बाबांच्या स्वमुखाचे शब्द कधीही असत्य ठरतील का? त्यांचा भक्त संकटात असता त्यांना तेथे समाधीत झोप कशी लागणार?

आम्हाला पण त्यांनी संकट समयी कशी मदत केली त्याविषयी आमचे दोन प्रसंग देत आहे.

आम्ही सर्व ८–१० वर्षांपासूनच श्री साईभक्त झालो आहोत. बाबा म्हणजे खरोखरच आम्हाला आमच्या घरातील एक वयोवृद्ध व्यक्ती वाटतात. आम्ही आमच्या दैनिक संसारिक सुखदुःखाच्या गोष्टी बाबांना सांगत असतो व प्रार्थित असतो कि देवा, येणाऱ्या संकटापासून आमचे रक्षण कर व त्याप्रमाणे ते नेहमीच आम्हाला संकट प्रसंगी मदत करतात.

माझे पति बँकेत नोकरी करतात. त्यांचे एक मित्रमंडळ आहे. १–२ रजा जोडून आल्या कि त्यांचा सर्वांचा काहीतरी प्रोग्राम असतो आणी हा प्रोग्राम म्हणजे सहकुटुंबाचा असतो.

ऑगष्ट १९७५ मधील ही गोष्ट आहे. जन्माष्टमीला जोडून २ रजा आल्या व ह्या मंडळाचा प्रोग्राम गुजरातचे प्रमुख धार्मिक स्थान अंबाजीला जाण्याचे ठरविले व त्याप्रमाणे १५–१६ तिकिटे बसची रिझर्व करण्यात आली. हा प्रवास पण सहकुटुंबियांचा होता.

आम्ही सर्व दुपारी २ वाजताच्या बसने अमदाबादेहून निघालो. आमच्या बसमध्ये गप्पा गोष्टींना ऊत आला होता, बस पुढे जात होती. तासभर बस चालली असेल नसेल आणि जोराच्या मुसळधार पावसास सुरवात झाली. डोंगरी चढणाचा रस्ता एका बाजूस खडक व दुसऱ्या बाजूस खोल दरी असा हा सर्पाकार रस्ता एकदम अंधारात बुडून गेला. पुढील काही दिसेनासे झाले व त्यामुळे आता कोठे बस आदळते कि काय अशी भीती सर्व उतारूंच्या मनात उत्पन्न झाली व आपण पावसाळ्यात उगाच हा प्रोग्राम केला असे वाटू लागले. सर्वच प्रवाश्यांनी देवाची प्रार्थना सुरू केली. कोणी गरबे गावे कोणी आरत्या म्हणाव्या असे.

जोराच्या पावसामुळे सर्वांना थंडी वाजू लागली. बसमध्ये सर्वत्र पाणीच पाणी झाले. कसे तरी करून एकदाची बस ६ वाजता अंबाजीला पोचली. खाली उतरल्यावर कोठे उतरावयाचे ह्याचा शोध करण्यास भर पावसात थंडीत कुडकुडत मुलाबाळांसकट निघालो. एकदाची जागा मिळाली. कपडे वगैरे बदलले, मेघराजाने थोडीशी विश्रांती घेण्याचे ठरविले आणि त्या अवधीत आम्ही देवाचे दर्शनास गेलो. दुसऱ्या दिवशी प्रातः आरती घेतली, दुपारची आरती झाली, जेवणखाण केले व आजुबाजूस काय काय पहाण्यासारखे आहे, तेथे कसे जावयाचे वगैरेचा तपास करून दुसरे दिवशी सकाळी जीपने जाण्याचे नक्की केले.

दुसरे दिवशी सकाळी ८ वाजता जीपमध्ये आम्ही सर्व २० जण दाटीवाटीने बसलो व प्रथम आम्ही तेथून १२–१५ मैल दूर असलेल्या कोटेश्वर महादेवाचे दर्शन घेण्यास निघालो.

अंबाजी हे स्थान खूप उंचावर आहे व त्यामुळे डोंगर पोखरून सर्पाकार रस्ते आहेत. ह्या रस्त्यावरून आमची जीप जोरात धावत होती. आम्ही सर्व आनंदविभोर होऊन आजुबाजूचे सौंदर्य पहात होतो. आणि बस कोटेश्वराच्या पायथ्याशी आली. मंदिर व गुंफा पाहून आम्ही तेथून "कुंभारीयाची लेणी" पहाण्यास जावयाचे नक्की केले.

परत जीप दौडू लागली. अर्धा अधिक रस्ता कापला असेल नसेल आणि समजले की आमच्यातील चोकशी नावाच्या माणसाचे घड्याळ पडले. ते फारच किंमती होते, जीपमध्ये तपास केला तेथे सापडले नाही म्हणून ते शोधण्यास दोघे परत माघारी गेले. व बाकी सर्व रस्त्यातच दगडावर अड्डा ठोकून मार्गप्रतीक्षा करीत बसले. तासभराने ते निराश वदनाने परत आले व त्यामुळे सर्वांनाच वाईट वाटले. परत मुक्कामी जावयाचे असा आम्ही विचार केला, परंतु चोकशी फारच धीराची व्यक्ति, त्यांनी सर्वांना निक्षून

सांगितले आता घडयाळ मिळणार नाही हे नक्कीच आहे. मग आपण आपले पहाण्याचे तरी का सोडायचे.

अनिच्छेनेच आम्ही कुंभारीयाची लेणी पाहण्यास परत जीपमध्ये कोंबलो गेलो. जीप चालू झाली आणि त्यात आवाज होत असल्याचे समजले. परत जीप रस्त्याच्या कडेला थांबली. दुरुस्त झाली आणि पुन्हा जीप सुरू झाली. 'कुंभारीयाची अप्रतिम लेणी पाहण्यास मिळाली. तोवर बसने गडबड केली नाही. तेथून आम्ही निघालो आणि थोडे अंतर कापते न कापते तोच जीप एकदम मागे वाघ लागलेल्या माणसासारखी सैरावैरा पळू लागली. मध्येच डाव्या मध्येच उजव्या बाजूला हालत डोलत मनमानेल तशी धावत होती. खडकाळ अरुंद रस्ता, एक बाजुस दरी दुसऱ्या बाजूस खडक व बेकाबु बस त्यामुळं आता सर्वांचे मरणच जवळ आले असे वाटले.

आम्ही सर्व एकमेकावर आदळले गेलो तेव्हा परिस्थिती आता किती गंभीर आहे हे सर्वांच्या लक्षात आले. आता सहकुटुंब मोक्ष होणार नक्कीच !

माझे पति व त्यांचा एक मित्र जीपच्या पुढील दरवाजाची फळी पाडून त्याच्यावर उभे होते. क्षणाक्षणाला मृत्यु आपल्याजवळ येत आहे हे दृश्य त्यांना स्पष्ट डोळयाने दिसत होते. कारण त्यांना सर्व रस्ता दिसत होता. मरणाच्या भीतीने आमची सर्वांची पाचावर धारण बसली. आम्ही सर्वच आता मृत्युच्या मुखात जाणार, सहकुटुंबाला मृत्यु एकदम कवटाळणार, आता मृत्युच्या मिठीतून आपणास कोणीही सोडवू शकणार नाही, अशी खात्री झाली. आपण सहमित्र मंडळ यमपुरीच्या मार्गावर चालत आहोत, असे वाटत होते. मृत्युचे भयंकर रूप उघड्या डोळयाने पहाता पहाता सर्वांगाला घाम सुटला, घशाला कोरड पडली. तोंडातून शब्द बाहेर येईनात. मृत्युला इतक्या जवळून पहाता कोणाची परिस्थिती अशी होणार नाही? मुले रडू लागली व सगळेजण ओरडू लागलो "मरी गया मरी गया बचाओ बचाओ" पण कोण कोणाला वाचवणार !

अशा परिस्थितीतही मला विचार येत होते की उद्या आमची चार प्रेते घरी अमदाबादला पोचतील व ती पाहून म्हाताऱ्या सासु सासऱ्यांची काय अवस्था होईल ! म्हणा ही कल्पनाच भयंकर होती. कारण त्यांचा एकचा एक मुलगा व तो पण सहकुटुंबासह अपघातात मरण पावला हे दृश्य कोणाला पहावेल का ?

अशा परिस्थितीत १०–१५ मिनिटे निघून गेली. कोणालाही देव आठवत नव्हता. आणि कसे काय कोण जाणे एकदम माझ्या तोंडातून रडता रडता किंकाळी बाहेर फुटली "बाबा हे काय होत आहे ! आम्ही आता सर्व मरणार. आम्हाला वाचवा बाबा वाचवा हो" आणि काय चमत्कार पहा. क्षणाचाही विलंब न करता ते आमच्या रक्षणार्थ धावून आले, डोंगराच्या वळणावर जे चुन्याचा पांढरा रंग देऊन दगड बसविलेले असतात ना त्यावर जिप आदळली. सर्वांनीच डोके घट्ट दाबून घेतले सर्वांना कळून चुकले की खडकावर आता जिप आदळणार व एकच किंकाळी "मरी गया बापा" म्हणून निघाली, व लगेच डोळे उघडले तो काय जिप दगडावर आदळली.

तो दगड मूळांसकट जमीनीतून निघून त्याचे तुकडे तुकडे झाले होते व रस्त्याच्या मध्यावर आमची जिप आडवी उभी होती. कोणी तरी तिला घट्ट साखळदंड घेऊन पकडावी तशी ती उभी होती. ड्रायव्हर शेजारची दोन माणसे रस्त्याच्या कडेला कोसळली होती. जीव बचवण्यासाठी सर्वांनीच जिपमधून भराभर उड्या मारल्या परंतु साधारण खरचटण्याशिवाय अधिक लागले असे कोणालाच नाही.

मुलांनी आई बापास मीठ्या मारल्या त्यांच्या दातखिळया बसल्या होत्या. माझ्या पतिला एकदम लो ब्लडप्रेशर झाले होते. सगळयांची छाती धडधडत होती; हातपाय कापत होते. कोणी कोणाशी बोलण्याच्या परिस्थितीत नव्हतो. अशा परिस्थितीत निर्जन रस्त्यात बसून होतो, अशा रीतीने किती वेळ बसून राहणार. परत बाबांनी वाचवले. म्हणून त्यांना नमस्कार करून चालण्यास सुरूवात केली. गाव दूर होते. लांबचे अंतर कापावयाचे होते. कोणाचेही पाय स्थिर पडत नव्हते, असे वाटत होते की महिन्याच्या आजारातून आताच आपण उठलो आहे.

पोटात अन्न नाही, पाणी नाही, घशाला कोरड पडली होती. तरी धडपडत लटपटत एक वळण कापले. आणि थोड्या दूरवर एक झोपडी दिसली. सर्वांना हायसे वाटले. कोणाचे घर असेल हा विचारही त्यावेळेस कोणाच्या मनास शिवला नाही. तेथे गेलो व रस्त्यात घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला व आम्हाला पाणी द्या. असे सांगितले त्या ग्रामवासियानी आम्हाला थंडगार, स्वच्छ पाणी पिण्यास दिले. त्यावेळेस ते आम्हाला अमृताहून गोड वाटले. जिवात जिव आला.

तेथून चढण उतरून आम्ही रस्त्यावर आलो तर परत साईनाथ बाबाच आमची वाट पहात एका सरदारजीच्या रूपाने उभे होते. सरदारजी जिप घेऊन आमची वाट पहात होता. आम्हाला पहाताच तो म्हणाला "चलो मैं अपनेको मुक्कामपर ले जाता हूँ" तुम्ही निर्धास्त असा आता परत असे होणार नाही. सर्वांना हवे तर होतेच पण मनात फारच भिती वाटत होती. मुले तर रडू लागली. म्हणे आम्ही नाही बसणार. कशीतरी समजूत घालून परत बाबांची उदी लावून आम्ही बसलो व सुखरूप अंबाजीला धर्मशाळेत पोचलो.

दुसरे दिवशी आम्ही आजूबाजूला न जाताच अमदाबादचा रस्ता धरला व निर्विघ्नपणे घरी आलो.

आता सारखे वाटते की खरच बाबा आपल्या भक्तासाठी, आपले बोल खरे करून दाखवण्यासाठी भक्ताच्या रक्षणार्थ त्या समाधि अवस्थेतून पण धावत येतात. फक्त भक्ताने पुकार मात्र करावा.

माझे बाबा त्यावेळेस जर धाऊन आले नसते तर आमचे काय झाले असते ! असो.

जसे त्यांनी आमचे रक्षण केले तसेच संकटसमयी ते आपणा सर्वांना रक्षोत त्यांची कृपादृष्टी आपणा सर्वांवर राहो हीच इच्छा. ❋

२१

# श्री दत्ता अवधूता

—डॉ. अनिल जायस्वाल
चितार ओळ, नागपूर–२

( नित्य निरञ्जनावधूत अक्कलकोट निवासी श्रीस्वामी समर्थ चरित्राच्या आधारे )

वाचकांनो !

मध्यान्ह आरतीत " दत्ता अवधूता श्री साई अवधूता " म्हणून आपण श्री सई-समर्थांस नित्य नियमित ओवाळतो. आज आपण मुख्यत्वे करून 'दत्ता अवधूता' या दोनच शब्दाबाबत थोडक्यात विचार करूया.

" दत्त हे श्री माता अनसूयेचे पुत्र व अत्रि महर्षि हे त्यांचे वडील होते. " — या संदर्भाची वाक्ये आपणास आपल्या प्राचीन पुरातन शास्त्रात पहावयास मिळतात.

'कुणाचीही असूया म्हणजे मत्सर न करणारी'

अर्थात, कुणाचे कधीही मत्सर न करणारी—तीच दत्तांस मातास्वरूपात लाभली.

'त्रि' म्हणजे त्रिगुणोद्भव विकार व

'अ' म्हणजे नाही.

अर्थात, अत्रि म्हणजे त्रिगुणोद्भव विकार ज्याच्यात नाहीत असेच वडील बाळरूपी दत्तास लाभले हे त्यांचे सुदैवच म्हणायचे.

अत्रि महर्षि व माता अनसूया या जोडप्यास मुलबाळ नव्हते. करीता पुत्र कामेच्छेने दुश्चर तपाचरण करणाऱ्या अत्रीस ज्योतिर्मय परमात्म्याने स्वतःलाच दान करून पुत्र स्वरूपात दिले असा उल्लेख शांडिल्योपनिषदात असून माता अनसूयेच्या उदरी दत्त जन्मास आले. परंतु एक गोष्ट लक्षात असू द्या की

श्री दत्ताचे जन्म, अनसुया आणि अत्रि या त्यांच्या मातापितरांमधील जन्य-जनक संबंधाच्या परिणामस्वरूप झालेला नसून स्वतः परमात्मा शक्तीच्या दानामुळेच झाला.

श्री दत्त हे स्वतः अयोनिज आहेत.

दत्तात्रेयच्या नावातच 'दान' हा अर्थ समावलेला आहे. परमात्मशक्तीद्वारे ते दान स्वरूपात दिले गेले म्हणून

'दत्त'

व आत्रिस दिला म्हणून

'आत्रेय' —(पुत्र)

या शब्दांच्या संयुक्ताद्वारेच 'दत्तात्रेय' हे नाव प्रचलीत झाले.

दत्त-पुराणाच्या पहिल्या अष्टकाच्या सहाव्या अध्यायात श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती म्हणतात :—

"लीलात्मना यो ऽ त्रिगृहे ऽ वतीर्णो दत्ताख्य उन्मत्तपिशाचवद्यः ।
बालो युवा क्वापि जरन् जटाभृत्कचिदृषिर्व्यक्तपरीक्षितश्च ॥
त्यागी सुभोगी क्वचिदस्ति सङ्गी
योगी सुवासाः क्वचिदस्ति नग्नः ।
तुष्टः कृशः पुष्ट इह क्वचिद्यो
दण्डी च भिक्षुः क्वचिदस्ति वर्णी ॥
गृही वनी वर्णविरूद्धचेष्टः क्वचिच्च वर्णाश्रमधर्मयुक्तः ।
इत्यादयो यस्य विचित्रचेष्टा देवर्षिहृद्धागयनं व्यतीतः ॥"

या श्लोकात दत्तात्रेयाचे परस्परविसंगत विचेष्टित सांगितले आहे. तो केव्हा सुभोगी आहे तर केव्हा त्यागी, केव्हा वनी तर केव्हा गृही, केव्हा दण्डी तर केव्हा भिक्षु, केव्हा वर्णाविरूद्ध वागणारा, तर केव्हा वर्णाश्रमधर्म परिपालन करणारा, केव्हा लावण्यललनांच्या अनाघ्रात यौवनाचा उन्मुक्त आस्वाद घेणारा तर केव्हा सर्वसंग-परित्यागी, अशा नानाविरूद्ध चेष्टानीही तो दूषित न होता उलट भूषितच झाला आहे.

ज्या ब्रह्मा-विष्णु-महेशांची प्रतीके म्हणून तीन मुखे मानली आहेत, तीच श्री दत्ताविषयी, त्या ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या त्रिविध शक्तींची ती प्रतीके आहेत.

ब्रह्मा म्हणजे स्वर्ग
विष्णु अर्थात स्थिती
व महेश म्हणजे प्रलय

अशा या तीन नावानी तीन शक्तींचा बोध आपणास होतो.

तीन मुखांनी सूचित होणाऱ्या त्रिविध शक्ती ह्या मानवी शरीराचे धर्म आहेत. रूद्रशक्ती, विष्णुशक्ती व ब्रह्मशक्ती – या तीन शक्ती ज्याच्या सदैव जागृत आहेत तो त्रिमुखी दत्तात्रेय आहे – असा हा लाक्षणिक शब्दप्रयोग आहे. अर्थात श्री साईसमर्थांच्या या तीनही शक्ती सदैव जागृत नसतात.

आपल्या असीम सामर्थ्याच्या जोरावरच दत्तात्रेय नित्य सत्‌आचारी होते. त्यांच्या नित्यनियमित दिनचर्येविषयी दत्तपुराणातील खालील ओळी लक्षात घेण्यासारख्या आहेत.

यस्यास्ति माहुरे निद्रा निवासः सह्यपर्वते ।
भागीरथ्यां सदास्नानं ध्यानं गंधर्वपत्तने ॥
कुरूक्षेत्रे चाचमनं धूतपापेश्वरे तथा ।
विभूतिधारणं संध्या करहाटे श्रियः पुरे ॥
भिक्षा विठ्ठलपुर्यस्य सुगन्धिद्रव्यधारणम् ।
भुक्तिः सारपुरे सायंसंध्या पश्चिमसागरे ॥

ही दत्ताची अद्भुत दिनचर्या म्हणजे आधुनिक मानवासाठी विमानातून क्षणार्धात विश्वसंचार करणाऱ्या भौतिक शास्त्रास एकाप्रकारे आव्हानच आहे. त्यांच्या या अलौकिक सामर्थ्याचे गुणगान करणे शाब्दिक सामर्थ्याच्या बाहेरची गोष्ट आहे.

म्हणून त्यांना 'अवधूत' या नावाद्वारेही आपण संबोधितो.

अ-व-धू-त या चार अक्षरात रहस्य समावलेले आहे.

दत्तात्रेयप्रणीत अवधूत गीतेत दिलेला अवधूत विशेषणाचा अर्थ खालील प्रमाणे आहे :—

अ—आशापाशविनिर्मुक्त आदिमध्यान्तनिर्मलः ।
आनंदे वर्तते नित्यमकारं तस्य लक्षणम् ॥ १ ॥

व—वासना वर्जिता येन वक्तव्यं च निरामयम् ।
वर्तमानेषु वर्तेत वकारं तस्य लक्षणम् ॥ २ ॥

धू—धूलिधूसरगात्राणी धूतचित्तो निरामयः ।
धारणाध्याननिर्मुक्तो धूकारस्तस्य लक्षणम् ॥ ३ ॥

त—तत्वचिन्ता धुता येन चिन्ताचेष्टविवर्जितः ।
तमोऽहंकारनिर्मुक्तस्तकारस्तस्य लक्षणम् ॥ ४ ॥

अवधूतावस्थेचे हे वर्णन मार्मिक, तात्त्विक आणि वैज्ञानिक आहे. अर्थात आधी द्यावे मग घ्यावे हा निसर्गाचा सिद्धान्तच या वरील ओळींत सामावलेला दिसतो.

तथापि या सर्वात महत्त्वाचा असाधारण गुण जर कोणता असेल तर तो त्याग हा होय.

त्यागानेच मानवास मानव्य प्राप्त होऊ शकते. श्री साईसमर्थांनी आपल्या असंख्य लीलेद्वारे त्यागाचाच धडा आपणासमोर मांडला. त्यांचे संपूर्ण जीवनच त्यागाने ओथंबलेले दिसते.

परमात्मशक्तीद्वारे दान स्वरूपात मिळालेल्या त्यागमयी मूर्ति— श्रीसाईसमर्थास म्हणूनच आपण

"साई अवधूता, दत्ता अवधूता"

या नावाने संबोधितो.

• •

# परमेश्वराकडे जाण्याचा सोपा मार्ग--श्री साई

**श्री. सदाशिव गणपत कुलकर्णी,** दादर २८.

ही एक पौराणिक दंतकथा आहे. एकदा नारद महर्षींनी भगवान विष्णूंना प्रश्न केला; 'भगवान, या जगात आपला सर्वांत श्रेष्ठ भक्त कोण ? भगवंतानी पृथ्वीकडे अंगुलिनिर्देश करून म्हटले. 'तो पहा, शेतात उन्हातान्हातून राबत असलेला शेतकरी. तोच माझा खरा भक्त आहे.' हे उत्तर ऐकून नारदांना वैषम्य वाटले. तिन्ही त्रिकाळ परमेश्वराचे नामस्मरण करीत त्रैलोक्यात भ्रमण करणाऱ्या माझ्यासारख्या भक्ताला भगवंतांनी श्रेष्ठ भक्त न मानता त्या यत्किंचित शेतकऱ्याला श्रेष्ठ भक्त मानावे या गोष्टीचे त्यांना फार वैषम्य वाटले. भगवंतांनी नारदाचे मनातील भाव ताबडतोब ओळखले. ते नारद महर्षींना म्हणाले; 'नारदा, मी सांगतो ते काम तू करशील काय ? ते जर तू व्यवस्थितपणे करशील तर मी तुला माझा श्रेष्ठ भक्त समजेन.' नारदांनी तात्काळ त्याला सम्मती दिली. त्याचबरोबर भगवान आपल्यावर कोणती जबाबदारी टाकणार आहेत याबद्दल त्यांचे मनात चिंताही उत्पन्न झाली. 'काम तसे फार कठीण नाही.' भगवान म्हणाले 'ही तेलाने काठोकाठ भरलेली वाटी घेऊन तू एक पृथ्वी प्रदक्षिणा करून ये. मात्र एक अट आहे की, या वाटीतील एक थेंबदेखील तेल जमिनीवर पडता कामा नये.'

एवढ्या क्षुल्लक कामाचा एवढा बाऊ केलेला पाहून नारदांना एकप्रकारे हसू आले. पृथ्वीप्रदक्षिणा करणे ही तर त्यांच्या हातचीच गोष्ट. ते ताबडतोब त्या मोहिमेवर निघाले; व योग्यसमयी पृथ्वीप्रदक्षिणा संपवून भगवंतापुढे उभे राहिले व म्हणाले, मी माझी कामगिरी पूर्णपणे पार पाडून आलो आहे. या वाटीतील तेलाचा एक थेंब-देखील मी खाली पडू दिला नाही.' भगवंतानी स्मित हास्य करून नारदांना प्रश्न केला, 'पण नारदा, तू ही एक पृथ्वीप्रदक्षिणा करण्याच्या काळात माझ्या नावाचा उच्चार किती वेळा केलास बरे ?' नारदमुनी जरा गडबडले, पण लागलीच त्यांनी उत्तर दिले, 'भगवान ! आपण तर सांगितले होते की, या वाटीतील एक थेंबदेखील तेल तू खाली सांडू देऊ नकोस. माझे सारे चित्त या वाटीवरच खिळून राहिले होते. मग आपले स्मरण अगर आपल्या नामाचा उच्चार मी कसा बरे करू शकणार ?' भगवान म्हणाले, 'नारदा एवढे लहानसे काम करताना माझे स्मरण तुला एकदा सुद्धा करवले नाही. पण तेच त्या शेतकऱ्याकडे पहा, दिवस उगवल्यापासून मावळे-पर्यंत उन्हातान्हातून, पावसापाण्यातून सारखे कष्टाचे काम करीत असताना देखील तो माझे स्मरण सतत केल्याशिवाय राहात नाही. तेव्हा अशी कष्टाची कामे करीत असतानाही तो माझे नित्य स्मरण करीत असतो. पण तुला मात्र एवढी क्षुल्लक

कामगिरी पार पाडताना माझे स्मरण एकदाही होऊ नये ! आणि म्हणूनच मी म्हटले आहे की, तो शेतकरीच माझा खरा भक्त होय.' हे उत्तर ऐकून नारदमुनी निरूत्तर झाले.

या दंतकथेवरून आपणास बोध होईल की परमेश्वराप्रत पोचण्याचे जे असंख्य मार्ग आहेत त्यात अत्यंत सुलभ मार्ग म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण हाच होय. पूजा अर्चा व्रतवैकल्ये ही आचरणात आणणे बरीच अवघड आहेत. त्या दृष्टीने नामस्मरण हाच अधिक जवळचा मार्ग होय. परमेश्वराची सतत आठवण व आपल्या हातून होणारी सर्व कृत्ये त्याला अर्पण करणे या दोन गोष्टीत जर आपण आपल्या मनाला सरळ शिस्त लावली तर आपण त्या मार्गाने झपाट्याने चालत जाऊ व अखेर गाठू यात संशय नाही.

परमेश्वराचे नामस्मरण मनातील अशुध्दता दूर करते आणि त्याला अर्पण केलेली कर्मे आपल्यातील अहंकार दूर करतात. पावित्र्य आणि अनहंकार याद्वारेच आपणास परमेश्वराची भेट होईल. अहंकाराचे द्वारे मनुष्य परमेश्वर व आपण त्याचेमध्ये एक-प्रकारची भिंत निर्माण करतो. कोणत्याही हेतूने अगर अहेतूक कोणतीही कर्मे तो करो त्या कर्मात त्याचा अहंकार हा गुंफलेला असतोच या बाबतीत एक मजेदार गोष्ट आहे.

एक ब्राह्मण होता तो असाच ओटीवर बसला असताना एक गाय त्याच्या कुंप-णात शिरून तेथे लावलेला भाजीपाला खाऊ लागली तेव्हा रागाचे भरात त्या ब्राह्मणाने एक दणकट सोटा त्या गाईच्या डोक्यात हाणला. मार वर्मी लागल्यामुळे ती गाय तेथेच गतप्राण होऊन पडली. आता गोहत्येचे पाप आपल्या माथी बसणार या कल्प-नेने ब्राह्मण फार घाबरला. परंतु त्याला एकदम आठवण झाली की; कोणतेही कर्म परमेश्वराला अर्पण केले की त्याचे पापपुण्य आपणास लागत नाही. त्याने ' श्रीकृष्णा-र्पणमस्तु ' म्हणून उदक सोडून आपल्या हातून घडलेले ते पाप श्रीकृष्णाला अर्पण केले. पुढे त्या ब्राह्मणाला चांगले दिवस आले. विपुल संपत्ती मिळाली. तेव्हा त्याने मनात विचार केला की आपण एक सहस्त्र ब्राह्मण भोजन घालून मिळणारे महापुण्य संपादन करावे. त्याप्रमाणे त्याने तयारी करून एक हजार ब्राह्मणास जेवावयास बोलावले. फार मोठी तयारी केली. वाड्याच्या दरवाजावर असलेल्या नोकरास सांगून ठेवले की मोजून बरोबर एक हजार ब्राह्मण आत सोड मग दरवाजा बंद करून घे. त्याप्रमाणे नोकर एक हजार ब्राह्मण झाल्यावर दरवाजा बंद करू लागला. इतक्यात भगवान श्रीकृष्ण ब्राह्मणाचे रूप घेऊन हातात पळीपंचपात्री घेऊन दरवाजाजवळ येऊन ठेपले. नोकर त्यांना म्हणाला, ' मालकाची आज्ञा आहे की आता एकाही ब्राह्मणाला आत सोडावयाचे नाही. हजारांची संख्या पूर्ण झाली आहे. ' श्रीकृष्ण म्हणाले, " मी

जेवावयास आलो नाही. मला फक्त तुझ्या मालकास भेटावयाचे आहे.” तेव्हा नोकराने एक ब्राह्मण आपणास भेटण्यास आला आहे अशी वर्दी मालकास दिली. श्रीकृष्ण म्हणाले, ब्राह्मणा मी काही जेवावयास आलो नाही. मला फक्त एवढेच जाणण्याची इच्छा आहे की, जो सहस्र भोजन यज्ञ तू आरंभिला आहेस तो कोणत्या हेतूने? या यज्ञाचे फल काय व कोणास मिळणार? ब्राह्मण म्हणाला, “महापुण्य लाभून मला स्वर्ग मिळेल हेच या यज्ञाचे फळ, यज्ञ केल्यामुळे मीच त्या फळाचा धनी!”

श्रीकृष्ण म्हणाले, “मग तू हे फळ परमेश्वराला का बरे अर्पण करीत नाहीस?”

ब्राह्मण म्हणाला, “मी इतका का एवढा मूर्ख आहे की खर्च करून मिळालेले पुण्य परमेश्वराला अर्पण करू? त्यावर श्रीकृष्ण हसून म्हणाले, या महायज्ञाचे पुण्य मात्र तू घेणार व तू मागे गाय मारून केलेल्या पापाचा धनी मात्र श्रीकृष्ण हं! फार छान गोष्ट आहे.” ते उत्तर ऐकून ब्राह्मण चांगलाच चमकला त्याने ओळखले की, हे सर्वांतर्ज्ञानी भगवंतच आहेत. त्याने त्यांचे पाय धरले. आपली सर्वांची स्थिती वरील गोष्टीतील ब्राह्मणासारखीच आहे. अहंकार आपल्यातून सुटता सुटत नाही. याकरिता आपली सारी कर्मे परमेश्वराला अर्पण करणे हाच अनहंकारी होण्याचा मार्ग होय. जेव्हा परमेश्वराचे नामस्मरणाचा अखंड ओघ मनात स्वेच्छेने चालू लागतो त्यावेळी मनातील सर्व अपवित्रता दूर होत जाते व साधकाला जाणीव होऊ लागते की, दैवी ईच्छेची व शक्तिची कामगिरी आपल्या अंतःकरणात सुरू झालेली आहे. व त्याचे सामर्थ्याने आत्मा प्रकाशित होत जातो. आत्म्याच्या ज्ञानाचा प्रकाश आणि प्रेमाचा सुकाळ सर्वत्र पसरतो, आणि अशा या वातावरणात सर्व विश्वाचा, सर्व भेदांचा अमर्याद रूपी सत्वामध्ये लोप होतो.

नाम अतिशय सोपे आहे. आत्म्याच्या स्वयंसिद्ध अस्तित्वावर वसलेले अज्ञानाचे थर ते दूर करते. ते हेतू पूर्ततेकरीता स्वामीचा, संथ व यशस्वी प्रयत्न करते. स्वतःचे आत्मसमर्पण करावयास हाच खरा मार्ग आहे.

नाममात्राचा उच्चार करावयास सुरुवात केल्यापासूनच त्याचा प्रभाव दिसू लागतो. अनरसारूपी अमृतांचा तुम्ही अनुभव घेऊ लागता. जसजसे तुम्ही पुढे जाऊ लागता तसतसा तुमचा आनंद वाढू लागतो. हा आनंद अत्यानंदात लीन होतो. त्याचे योगे तुम्ही तुमचे शरीराचे अस्तित्व विसरता व तुमच्यातील परमेश्वर तत्वात मिसळून जातो. प्रकाशाचे योगे ज्याप्रमाणे अंधाराचा लोप होतो. त्याप्रमाणे तुमच्या व्यक्तित्वाचा लोप होतो. या स्थितीपर्यंत आल्यानंतर साधकसिद्ध बनतो. म्हणजे त्याला पूर्णता येते.

नामाचे योगाने आत्मसमर्पण होते. आणि मनाची एकाग्रता झटकन् होते. एकांतात बसल्याबरोबर तुम्ही त्या चेतनामय वातावरणात तन्मय होऊन जाता. नामोच्चाराचा

सतत पाठलाग केल्याशिवाच सत्यावर आपले मन केंद्रीत होणार नाही. जो आनंदाने सुरुवात करतो तो त्या मार्गावरून आनंदाने चालतो, आणि त्याचे ध्येयही आनंदमय असते, आणि तो स्वतःच आनंदरूप बनतो. हेच ते मधूर मिलन. पूर्णत्व यासच म्हणतात. आणि परमेश्वराचा उच्च अनुभव नामामुळेच मिळतो. मोठमोठ्या संतानी याच नामभंत्राच्या मार्गाचा आश्रय केला. आपणही त्यांचाच मार्ग अनुसरू. श्री साई-बाबांची गोष्ट सांगतात की ते नियमीत लेंडीबागेत जाऊन कित्येक तासपर्यंत बसत असत त्यावेळी तिकडे कोणासही फिरकू देत नसत. फक्त दोन बादल्या पाणी घेऊन जात; व या बादलीतील पाणी त्या बादलीत व त्यातील यात असे करीत बसत. अर्थात या नाममंत्रामुळेच ते सिद्ध बनले. आपल्याला दुसरे काही करता आले नाही तरी 'श्री साई' या नाममंत्राचा उच्चार करून तरी आपण आपला उद्धार करून घेऊ शकू.

● ●

## वाचकांचा पत्रव्यवहार

संपादक महाशय,

स. न. वि. वि.

"साईलीला" च्या मे महिन्याच्या अंकातील श्री. दशरथ रामजी तळेकर ह्यांचा "प्रत्यक्ष श्री साईदर्शन" हा लेख वाचला.

श्री साईबाबांच्या तत्वज्ञानाचा, त्यांच्या आदर्श विचारसरणीचा, त्यांच्या अजब लीलांचा, त्यांच्या अचाट योगसामर्थ्याचा, त्यांच्या सत्कृत्यांचा प्रचार प्रसार करण्याच्या दृष्टीने वरील लेख खासच उपयुक्त ठरणार आहे. बाबांकडे गाऱ्हाणे घेऊन येणारी व्यक्ती साईबाबांची भक्त नसून फक्त संकटकाळी ती बाबांचे स्मरण करते असे म्हणणे चुकीचे आहे.

बाबांनी अनेकांना स्वप्नातून दर्शन दिले आहे. परंतु लेखकाला जो "साक्षात्कार" घडला तो अगदीच वेगळा वाटतो. एवढेच नव्हे तर सर्व भक्तांचे प्रतिनिधित्व करून यांचे गाऱ्हाणे बाबांकडे नेण्याची तेवढीच कामगिरी त्याना ऐनवेळी कशी सुचली ?

**सौ. निर्मला सावरकर**
मैलारगड्डा, सिकंदराबाद

# सुविचार

(१) "धैर्याचे खत, सहाय्याचे पाणी आणि श्रद्धेचे बिज पेरून कल्पवृक्ष उभारून त्याच्या दाट छायेत स्वच्छंदेने विहार करावा."

(२) मानवी मनाला न्याय नितीच्या काटेरी कुंपणानी बांधून धर्माचे पालन होत नाही.

(३) जगी मनुष्य पैसे देऊन माणसे विकत घेऊ शकेल परंतु पैसे देऊन माणसाची मने विकत घेऊ शकणार नाही.

(४) ज्याप्रमाणे व्यवहारी जगामध्ये बँकेमध्ये पैसे ठेवून निवृत्त झाल्यावर त्याचे व्याज घेऊन मनुष्य आपले उत्तरार्ध आयुष्य सुखाने घालवू शकतो. त्याप्रमाणे परमेश्वराच्या बँकेमध्ये श्रद्धेची ठेव ठेवून भक्तीचे व्याज घेऊन त्याला आपले आयुष्य सुखाने जगता येईल. येथून तेथून म्हणाल तर हा व्यवहार आहे. तो हा व्यवहार मनुष्यास समजला पाहिजे. तो जीवन सुखाने जगवू शकतो.

(५) शुद्ध अंतःकरणातील प्रेम हेच पूर्ण आहे. बाकी व्यवहार केव्हाही अपूर्णच राहणार आहे. प्रेमाशिवाय पूर्णता येत नाही.

(६) अज्ञान हे असत्य आहे आणि ज्ञान हे सत्य आहे. अज्ञानामुळे कलह होतो व ज्ञानामुळे मित्रत्व व सौख्य जडले जाते.

(७) जीवनाचे दोन मार्ग आहेत. एक त्याग व दुसरा भोग. त्यागी जीवनाचा मार्ग काट्याकुट्याचा व कष्टमय त्रासदायक जरी वाटला तरी अंती सुखमय-आत्मानंदी देणारा आहे. सुखी भोगी जीवन क्षणभंगुर आहे. ते क्षण नाहीसे होताच अन्ती दुःखाच्या डोहात लोटतात.

(८) प्रेम ही ज्योत आहे. किरण हे स्नेह आहे.

(९) स्वानुभव हाच माणसाचा गुरू आहे.

प्रेषक – **सौ. कलावती वसंतराव चव्हाण**
बी/६ अंबामाई मिस्त्री निवास
सेनापती बापट मार्ग,
दादर मुंबई नं. ४०००२८.

# शिरडी वृत्त-माहे मे सन १९७६

मे महिन्यात शाळा, कॉलिजांच्या सुटीमुळे साईभक्तांची गर्दी बरीच होती. संपूर्ण महिना यात्रेच्या स्वरुपात गेला. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

**कीर्तन** :– १) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. २) सौ. शांताबाई बा. निकम मुंबई यांचे कीर्तन.

**प्रवचन** :– १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा बाधचौरे शिर्डी. २) ह. भ. प. काशिनाथ रु. लाठी जळगाव.

**भजन, गायन वादन** :– १) श्री. विठल ग. किर्तीकर मुंबई. २) श्री. विजय शामराव मध्यप्रदेश. ३) श्री. शरदराव लोंढे इन्दोर. ४) भगवान सत्य साई सेवा समिती. अहमदनगर. ५) श्री. मधुकर श. हटकर मुंबई. ६) ह. भ. प. विजयबाबा महाराज नागपूर. ७) श्री. के. सिकंदर, श्री. प्रेम-भोसले व मंडळी. ८) सौ. अनुराधा अ. पौडवाल मुंबई ९) श्री. रवि रा. दाते मुंबई, १०) श्री. अरुण प्र. पौडवाल ११) सौ. एन. चिंतामणी - इस्ट गोदावरी ( आ. प्र.) १२) श्रीमती उषा श्रीवास्तव जबलपूर. १३) श्री. दुष्यन्तकुमार च. भट. श्रीमती गीता डी. भट अहमदाबाद. १४) श्री. आक्कादेवी प्रासादिक भजन मंडळ कुलाबा. १५) सौ. शकुंतला मो. जोशी नासिक. १६) सौ. ज्योति मनोजा मुंबई १७) श्री. एस. आर. बाबा जबलपूर. १८) कु. मीना उ. गद्रे नासिक. १९) श्री. के. बी. रमणामूर्ति विशाखापट्टण. २०) श्री. लक्ष्मण ग. देवासकर मुंबई. २१) कु. बी. डी. ऑफ, कु. व्ही. डी. ऑफ, मुंबई २२) श्री. सूर्यकान्त गुडे नासिक.

**माननीयांच्या भेटी** :–

१) मा. श्री. डी. एन. कपूर, IAS. कमिशनर औरंगाबाद डिव्हीजन.
२) मा. श्री. शिवाजीराव पाटील, जिल्हाधिकारी अहमदनगर.
३) मा. श्री. माधवराव माने, मेंबर पब्लीक सर्विस कमिशन महाराष्ट्र.
४) मा. श्री. डी. डी. चव्हाण, वन व कारागृह उपमंत्री महाराष्ट्र.
५) मा. श्री. एन. के. पारेख, न्यायाधीश सिटी सिव्हील कोर्ट मुंबई.
६) मा. श्री. के. टी. राठोड, मत्स्योद्योग मंत्री, कर्नाटक राज्य बंगलोर.
७) मा. श्री. शा. गो. घोलप, लहान पाटबंधारे, पशुसंवर्धन, शाळाविकास उपमंत्री
८) मा. श्री. बी. के. चौगुले IAS सचिव शेती सहकार खाते महाराष्ट्र.

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात उकाडा जाणवला परंतु रात्रीचे वेळी हवेत गारठा होता.

# प्रिय क्षेत्र पंढरपूर

कलकलकर संदेश सुनाये
चन्द्रभागा यों बहती जाये
आषाढ-कार्तिक एकादशी को उमडे भक्ति पूर
प्रिय क्षेत्र पंढरपूर ॥ टेक ॥

युग युग से हैं खडे ईंटपर
हाथ धर यों विठ्ठल कटि पर
सगुण रूप का दर्शन मन में, जाये चिंता दूर ॥ १ ॥
प्रिय क्षेत्र पंढरपूर

धन्य धन्य वह भक्त पुंडलिक
सेवा कीन्ही बड़ी अमोलिक
प्रगट भये परब्रह्म भू पर, नाचे यह मनमयूर ॥ २ ॥
प्रिय क्षेत्र पंढरपूर

ज्ञान, नाम की रसमय ज्ञानी
तुकाराम की अभंग वाणी
जनसागर में लगीं उमड़ने भक्ति लहरें सुदूर ॥ ३ ॥
प्रिय क्षेत्र पंढरपूर

'जय जय रामकृष्ण हरी'
'विठ्ठल, विठ्ठल जय हरिविठ्ठल'
'पांडुरंग ध्यानीं, पांडुरंग ध्यानीं'
ताल मृदंगसह दिंडी बढ़ती
विठ्ठल नाम का घोष करती
विठ्ठलमय ये सारी धरती, छन छन बजते नुपूर ॥ ४ ॥
प्रिय क्षेत्र पंढरपूर

परम भाग्य की ये चन्द्रकोर
खीचे पंढरी मन की डोर
विठ्ठल-दर्शन सुखदायी रे, शुद्ध भाव भरपूर ॥ ५ ॥
प्रिय क्षेत्र पंढरपूर

कवि - राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकरवाड़ा भगतसिंग पथ, डोम्बिवली (पूर्व)

## श्रीसंत साईबाबा

जय शिरडीचे साईनाथ बाबा ।
सांज सकाळी गावे हो गुणगान ॥
अगाध महिमा अगाध किर्ती ।
जन्मजन्मांतरीचे हो नाते ।
तुझ्या कृपेची सावली मजला ।
तारेल हो हा भवसागर पार ।
जय शिरडीचे ... ॥
भाव विश्वाला तुझिया किमया ।
तू दयेचा हो सागर नाथ ।
दीन दुखितांचे होई श्रद्धास्थान ।
तारेल हो कृपे भवसागर पार ।
जय शिरडीचे ... ॥
संघर्षाच्या वाटेवरती तुमचे ।
आम्हाला हो आश्रयस्थान ।
भक्ती तुमच्या ठायी वसली ।
दयेचे सागर तुम्ही तारा तारा ।
जय शिरडीचे ... ॥

श्री. कृष्णकुमार खडतरकर
'नंदलाल'

## साई माउली

मुखी असता साई साई
कशास भीतो मानव प्राणी
तीच तारून नेईल तुजला
सर्व संकटातुनी ॥ १ ॥

षड्रिपु जरी हे डंक मारिती
मन हे रमू दे साई ध्यानी
प्रेमे जर तू हाक मारिसी
येईल त्वरित माउली ॥ २ ॥

अति कृपाळू आहे ही आई
भक्त जनांची हीच साउली
श्रद्धा आणि सबुरी देता
होईल मनी संतोषी ॥ ३ ॥

भक्तिरूपी पुष्प अर्पुनी
करीते मी अल्प चाकरी
मान्य करेल ती, आशा इतुकी
आहे मम अंतरी ॥ ४ ॥

कु० पुष्पलता मोहरे
बडे पोष्ट ऑफिस के पास
राजेन्द्र नगर बिलासपूर (म. प्र.)

# सखा साईनाथ

माझा तो श्रीहरी । सखा साईनाथ
कलियुगीं प्रकटला । अनाथांचा नाथ
तुळशीच्या दळाहून । सावळीच कांती
श्रद्धा सबुरीच्या दोन । डोळियात ज्योति
साधनेचा सिंधू । ॐकारात बिंदू
नभीं पूर्ण इंदू । पौर्णिमेचा
डोळीयांत नाचे बीज । अधांतरी यांस नीज
उमललें पूर्ण बीज । ज्ञान--भक्ति
" जैसा जो जो करेगा । वैसाही वो भरेगा "
" अल्ला भला करेगा " । बदलेंत साई
" बोलु नका उणें दुणे । मला येतें दुखणें "
किती गोड वचनें । अम्हा मार्ग दावी

• वसंत प्र. जोशी
गव्हर्नमेंट सर्व्हंटस् कॉलनी, बी १००/२ वांद्रा पूर्व, मुंबई-५१

# दत्तरुपी साई

श्री गुरुदत्ता जय अवधूता । स्वामी समर्था येई हो येई हो ॥ ध्रु.॥
साई हो तुज वीण । वाली कोणी नाही हो ।
सर्व देव हे धुंडुनी जगती । व्यर्थची शिणले मन माझे ।
तव कृपेची आठवण होता । नेत्रा नीर हे वाहि हो ॥ १ ॥
आप्त सोयरे सर्व सुखाचे । विषम काळी नच कोणी ।
अंतर जाणूनी धांवत येशी । कनवाळू तूं आई हो ॥ २ ॥
या शशीला धरीलेस हाती । पैलतीराला नेई हो

— सौ. माधुरी कुलकर्णी

# परब्रम्ह

परब्रम्ह तू! परमात्मा तू ।
साईनाथ हो साईनाथ ।
आत्म्याचे परमात्म्याशी ।
अतूट जडले नाते ।
भवसागरी प्राण तू ।
जीवनदाता साईनाथ ।
        परब्रम्ह तू! परमात्मा तू ।

अंतरी तुझीच ही छाया ।
तुझ्या कृपेची ही सावली ।
तुझ्या दरबारी दंग ।
झाली माझी काया नाथा ।
        परब्रम्ह तू! परमात्मा तू ।

आशेचे निराशेचे हो ।
चक्रामध्ये फसलेला ।
जीव तुझ्या ठायी आज ।
बघा कसा लीन नाथा ।
        परब्रम्ह तू! परमात्मा तू ।

कृष्णकुमार खडतरकर 'नंदलाल'.
डायरेक्टर नंदलाल असोसिएशन,
१२।२ विधानसभा क्वार्टर्स, नागपूर.

## अशी ही शिरडी

कृपेचा सागर
साई विघ्नहर
सत्य संकल्पांचा
दाता सर्वेश्वर !......१

संतांचे माहेर
शिरडी श्रीमंत
बारमाह येथे
भक्तीचा वसंत !......२

नवविधा भक्ती
रासक्रीडा खरी
नवरंग पहा
उधळीतो हरी !......३

आनंदाची येथे
मुक्त उधळण
ऐकू येते येथे
जनीचे दळण !......४

मुरलीचे सूर
रामधून येथे
नामाच्या गजरें
आनंदा ये भरते !......५

— विनायक पाठक
बी १७–२३४ राजावाडी,
घाटकोपर मुं-७७.

## भजा भजा साईनाथ !

शिर्डीपती कृपावंत
दीनबंधू रमाकांत
भजाभजा साईनाथ–अहर्निश ॥१॥

नाम घेता भक्तीभावे
साई नवसाला पावे
भक्तजनांसाठी धावे–संकटास ॥२॥

भक्त तारावयासाठी
साईनाथ जगजेठी
अवतरले भूवरती–कलियुगी ॥३॥

असे माझे साईनाथा
भजा सारेजण आता
चरणी ठेवून माथा – मनोभावे ॥४॥

— रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन,
नवापूर जि. धुळे

# गरीबांचा देव

गरीबांचा देव साई वसे शिरडीला।
जाऊ चला आपण त्याच्या भेटीला ॥ध्रु०॥
दुःखी जनांची साई माऊली
धरितसे भक्तांवर कृपा सावली
दूर करी साईबाबा, साऱ्या त्रासाला ॥१॥
करुणेचा साई असे सागर
अक्षय शांतीचे तसे आगर
तारितसे देव जगीं अपुल्या भक्ताला ॥२॥
ठरवुनि अपुले शिरडी धाम
अवतरला जगांत फिरुनि राम
वंदन कराया त्याच्या चरणाला ॥३॥

– दत्ताराम आ. बारस्कर
१६ संतसेना महाराज मार्ग,
खो. नं. ३४, ५ वा माळा मुंबई ४०००४

# साई ले चलो !

प्रभु ! हे साईनाथ,
परम पावन प्रकाश की ओर ले चलो ।
नाशवान पदार्थोंका भुका हूँ,
अनुग्रह करो, साई,
शाश्वत आनन्द की ओर ले चलो ।
भौतिक जगत,
मायामय प्रपंच,
अन्धकार से ले चलो,
पावन प्रकाश की ओर
अमरता का वरदान देकर,
मृत्युरुपी कालिमा भय छाया से,
मुक्त कर दो, साई
तुम्हारे पाद स्मरण में, विलीन कर दो,
मुझे असद् से सद् की ओर, ले चलो !

– गुंडेराव पटवारी
"साहित्यरत्न" प्राध्यापक
यन्. यफ. जे. कॉलेज, P.O. बिदर, (कर्नाटक)

# श्रीसाईंचा धावा

शिरडीच्या साईबाबा, देवा धाव रे धाव रे मला पाव रे ॥ध्रु॥

तुझ्या समोरी बसुनि,

केली तुझी विनवणी,

नको अव्हेरू, तुझे लेकरू, चरण दाव रे ।१।

ये रे ये समोरी,

ठेऊं दे डोई पायावरी,

तुझ्या हाते ऊदी लाव रे लाव रे ।२।

तुझ्या कृपे घेते श्वास,

तुजवरी पूर्ण विश्वास,

माझा तुझ्यावरी सारा भार रे भार रे ।३।

जे जे घडे ते तू घडविसी,

तुझ्या पायीं भक्ति जडविसी,

तुझी किमया न्यारी मला ठावी रे ठावी रे ।४।

म्हणोनि मी करी धावा,

भेट देई साईं देवा,

आता अंत नको पाहू रे, पाहू रे ।५।

—सौ. श्री. शहाणे, डोंबिवली

# दत्ताचा अवतार

दत्ताचा अवतार साईं भक्ताचा आधार, रक्षा करे त्याची जो ठेवी त्यावर भार ॥ ध्रु० ॥

भक्ती भाव ज्याचा असे त्यांचे ठाईं ।

न लुटती लुटारु तयाची कमाई ।

गरीब असो सावकार होई सुखी त्याचा संसार ॥ रक्षा...१ ॥

मुखी राम रहिम आवडे ते नाम ।

एक तया वाटे धर्मा तमाम ।

देवावर अधिकार त्याची महिमा अपरंपार ॥ रक्षा...२ ॥

अनाथाचा नाथ भक्ताचा कैवारी ।

मिटे सारे दुःख जाता तया दारी ।

करति ते उपकार त्याच्या मर्जीच्या अनुसार ॥ रक्षा......३ ॥

मिळविण्यास मर्जी अर्ज कर तयाला ।

श्रद्धेविन नाही मोल विनंतीला ।

'रामनाथ' नमस्कार साईं चरणी लाखो वार ॥ रक्षा...४ ॥

रामनाथ गुरुतुले, भिवापूर वॉर्ड, चंद्रपूर

५७

# तुमच्या चरणासी श्रीसाई

गत जन्मिची असेल कांही घडली पुण्याई
म्हणोनि येणे होते तुमच्या चरणासी साई

१– आता न चिंता भवितव्याची
जीवनातल्या सुख दुःखांची
नामस्मरणे तुमच्या बाबा व्यथा दूर होई ॥
गत जन्मिची असेल काही घडली पुण्याई

२– समिप येई समाधिच्या जो
श्रद्धेने मज पुकारील जो
पालन करण्या आयुष्याचे तुम्ही दिली ग्वाही
गत जन्मिची असेल काही घडली पुण्याई

३– जन्मजन्मिचे तुमचे नाते
याहुनी नाही भाग्य कोणते
या दरबारी सेवा घडता मन मोहुन जाई
गत जन्मिची असेल काही घडली पुण्याई
म्हणोनि येणे होते तुमच्या चरणासी साई

– श्री. जयवंत कुलकर्णी (पार्श्वगायक)
कुलकर्णी कॉटेज, विलेपारले

## संत गुलाबबाबा १३–१४ जुलैस मुंबईत

नागपूरचे महान श्रीसाईभक्त श्री गुलाबबाबा येत्या १३ व १४ जुलै रोजी मुंबईस येत असून त्यांचा मुक्काम डॉ. के. भ. गव्हाणकर, इंदिरा निवास, पहिला मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, कुर्ला पोस्टकचेरीजवळ, कुर्ला, मुंबई ७० येथे राहील. डॉ. गव्हाणकरांचा दूरध्वनी क्रमांक ५५१२२५ असा आहे. दर्शनास येणाऱ्या भक्तांनी वरील नोंद घ्यावी.

## अभिनंदन ! अभिनंदन !

● आमच्या मुंबई कार्यालयाचे महा व्यवस्थापक श्री. विनायकराव आपटे यांचे सुपुत्र चि. नीलकंठ हे गेल्या १० वी एस्. एस्. सी. परीक्षेत घाटकोपर केंद्रास दुसरे व त्यांच्या शाळेतून पहिल्या क्रमाकांने उत्तीर्ण झाले. त्यास सत्तर टक्याहून अधिक गुण मिळाले. तसेच आमचे लेखक श्री. चंद्रकांत सामंत यांचे सुपुत्र चि. यतीन, गिरगावातील आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेतून पहिले व सबंध बोर्डात सोळाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यांना ८६ टक्के गुण मिळाले. आम्ही दोघाही विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून भावी आयुष्यात त्यांना सुयश चिंतितो.

# साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष "रामावतारी" "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान् सच्चिदानंद सद्गुरु **श्रीसाईबाबा** (शिरडीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील '**सोनियाचा दिस**' होय.

आजच श्रीसाईबाबांची शीलाखंडावरील पूर्णाकृती पंचधातूची (ब्रॉझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा. मग काय रोज पूजा आरती नैवेद्य म्हणजे जणू काय "**झाहले घराचे मंगल देऊळ.**"

अशा तऱ्हेने साईभक्ताचे प्रत्येक घर हे एक लहान का होईना पण प्रत्यक्ष बाबांचे मंगल देऊळ बनावे अशी इच्छा मनी धरून आम्ही श्रीसाईबाबांची ९ इंच उंच व ५ इंच रुंद अशी पंचधातूची अत्यंत मजबूत अशी मूर्ति बनविली आहे. जिला अगदी लहान मुलांपासूनसुद्धा फारसे जपावे लागत नाही.

मूर्तीचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती पंचधातूची व योग्य साईजची बनविल्या-मुळे एक तर मूर्ति ताम्हनांत ठेवून तिला सुवासिक अत्तराने अगर पंचामृताने स्नान, अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला डोक्यावर शिरपेच, मुकुट इत्यादि अलंकार व फेटा अगर इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ति अत्यंत शोभिवंत करून आपल्याला कमालीचे मानसिक समाधान मिळते.

मूर्तीची किंमत अत्यंत वाजवी ठेवली आहे !

तसेच श्रद्धावंत भक्तांच्या काही अडचणीही आम्ही लक्षात घेऊन योग्य प्रकारे सहाय्य करू ! बाहेरगावी मूर्ति पोस्टाने अगर व्ही. पी. ने पाठवू.

"मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे उपलब्ध आहेत."

अधिक माहिती वा इतर तपशिलासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा :–

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,**
पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७
फोन नंबर : ५७ ६२ ९८. भेटण्याची वेळ : सकाळी ७ ते ९ रात्री ७ ते ९.